मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/ ४१३३/०२

श्री.अर्जून विष्णू चिंधे — अपिलार्थी
पोलीस अधिकारी वसाहत, ७ वा मजला,
रुम नं.२९, सर भालचंद्र रोड,दादर (पूर्व),मुंबई ४०० ०१४

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहसचिव पोल-५ब
गृह विभाग मंत्रालय,मुंबई ३२ — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी जन माहिती अधिकारी
पोलिस महासंचालक यांचे कार्यालय,शहीद भगतसिंग मार्ग
कुलाबा, मुंबई ४०० ०१

-विवेचन-

श्री.अर्जून विष्णू चिंधे यांनी दि.५.१२.२००९ रोजी आयोगाकडे अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये जे व्दितीय अपिल केले त्या अपिलाची सुनावणी दि.१.४.२००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अर्जदारास त्यांच्या सहायक पोलिस निरिक्षक पदासाठी मानीव तारीख निश्चित व तद्नुषंगिक इतर माहिती पाहिजे होती. हा अर्ज त्यांनी गृह विभागाकडे केला होता. परंतू या संबंधीचे सर्व अधिकार पोलिस महासंचालकांना असल्यामुळे तो अर्ज पोलिस महासंचालक यांच्याकडे पाठविण्यांत आला. साधारणतः अशा प्रकारचा अर्ज अर्जदाराने पोलिस महासंचालक कार्यालयास या आधी केलेला आहे व त्यांना माहिती देण्यांत आलेली आहे. ऑगस्ट २००८ सालच्या पत्राने तसेच वरील अर्ज महासंचालक कार्यालयामध्ये प्राप्त झाल्याने त्यांना दिलेला मानीव दिनांक कशा पध्दतीने देण्यांत आलेला आहे, याचे विवेचन असणारे पत्रही पोलिस महासंचालक कार्यालय यांनी श्री.चिंधे यांना पाठविलेले आहे. हा निर्णय त्यांना मान्य नसेल तर त्यांनी रितसर संबंधित प्राधिकरणाकडे दाद मागावी. माहितीचा अधिकारात माहिती देण्याबाबत कसूर झालेला दिसत नाही. मात्र या निर्णयासंबंधीची जी फाईल, नोटींग्जची प्रत असेल ती प्रत अर्जदारास दिलेली नसल्यास ती देण्यांत यावी.

-आदेश-

अपिल अंशतः मान्य करण्यांत येत आहे. जन माहिती अधिकारी,पोलिस महासंचालक यांनी वरील निर्देशिल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १एप्रिल २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/ ४११८/०२

श्री.मंगेश जयवंत चव्हाण
चारकोप कांदिवली एकता नगर को.ऑ.हो.सो.लि.
रुमं.न.२९४/४५, एस.न.१५७,
मारवे चारकोप लिंक रोड, कांदिवली (प)
मुंबई ६७

अपिलार्थी

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहमुख्य अधिकारी यांचे कार्यालय
म्हाडा, गृहनिर्माण भवन वांद्रे (पूर्व)
मंबई ५१

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी सहाय्यक भूव्यवस्थापक,बोरीवली
मुंबई मंडळ, गृहनिर्माण भवन
वांद्रे (पूर्व)मंबई ५१

-विवेचन-

श्री.मंगेश जयवंत चव्हाण यांनी दि.५.१२.२००९ रोजी आयोगाकडे अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये जे व्दितीय अपिल केले त्या अपिलाची सुनावणी दि.१.४.२००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळी अपिलार्थी अनुपस्थित होते व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपिलीय अधिकारी यांनी अर्जदारास हवी असणारी माहिती १५ दिवसाचे आत उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले होते व अर्जदार प्रथम अपिलीय आदेशानुसार दि.२६.११.२००८ रोजी नस्तीच्या पाहणीसाठी गेले असता त्यांना नस्ती अवलोकनासाठी मिळालेली नाही. म्हणून जन माहिती अधिकारी यांना असे निर्देश देण्यांत येत आहेत की, दि.१५.४.२००९ रोजी सकाळी ११.०० वाजता अर्जदारास सदरील नस्ती दाखवावी व त्यांना हव्या असणा-या कागदपत्राच्या प्रती देण्यांत याव्यात.

तसेच सदरील माहितीची नस्ती अपिलार्थीस कां दाखविण्यांत आलेली नाही, याबाबत जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द शास्ती कां लादण्यांत येऊ नये,याबाबतचा खुलासा दि.२०.४.२००९ रोजी पर्यत आयोगास सादर करावा.

-आदेश-

अपिल मान्य करण्यांत येत आहे. उपनिर्दिष्ट कार्यवाही करण्यांत यावी.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १ एप्रिल २००९

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्रमांक २००९/ ४१३४/०२**

**श्री.अरुण दशरथ बेळेकर** **अपिलार्थी**
**०२, परशुराम पाटील निवास.**
**एकसर कोळीवाडा, बोरीवली (प)मुंबई ४०० ०१०३**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा जन माहिती अधिकारी** **उत्तरवादी**
**उपशिक्षणाधिकारी (परि-४) यांचे कार्यालय,**
**बृहन्मुंबई मनपा शिक्षण विभाग,**
**बजाज रोड, मनपा शाळा इमारत**
**१ ला मजला, कांदिवली (प),मुंबई ४०० ०६७**

**-विवेचन-**

**श्री.अरुण दशरथ बेळेकर यांनी दि.१८.६.२००९ रोजी आयोगाकडे अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये जे व्दितीय अपिल केले त्या अपिलाची सुनावणी दि.१.४.२००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.**

**अपिलार्थीना बोरीवली (प)एक्सर तळेपाखाडी म्यु. शाळेतील सेंट रॉक महाविद्यालयाला देण्यांत आलेल्या परवानगीच्या चौकशी बाबत दि.२२.२.२००८ रोजी तक्रार अर्ज दिलेला आहे त्याच्या चौकशी अहवालाचा तपशिल व कार्यवाहीची माहिती विचारली होती. अर्जदारास याबाबत उपचौकशी अधिकारी, परिमंडळ चार व सात अंधेरी के/पश्चिम विभाग कार्यालयात चालू आहे व अद्याप अंतिम निर्णय प्राप्त झालेला नाही असे कळविले. हया सुनावणीच्या वेळेला हे पत्र लिहूनही जवळपास एक वर्ष लोटलेले आहे. या संदर्भातील संपूर्ण माहिती अर्जदारास (जर आवश्यक असेल तर संबंधित कार्यालयातून घेऊन)१५ दिवसाचे आत त्यांना देण्यांत यावी असे निर्देश जन माहिती अधिकारी यांना देण्यांत येत आहेत. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.**

**-आदेश-**

**अपिल मान्य करण्यांत येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी उपशिक्षणाधिकारी, परिमंडळ-४,मनपा यांचे कार्यालय यांनी वर निर्देशिल्याप्रमाणे कार्यवाही करावी.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**
दिनांक १ एप्रिल २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/ ३३४/०२

श्री.विकास रामदास शिंपी (जगताप) अपिलार्थी
हॅपी होम कॉलनी, भुसावळ हायवे रोड
जळगांव

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा ---उत्तरवादी
प्रमुख लिपीक जळगांव नगर भुमापन अधिकारी,
जळगांव

जन माहिती आधिकारी जिल्हा अधिक्षक
भुमि अभिलेखक,जळगांव.

-विवेचन-

श्री. विकास रामदास शिंपी यांनी आयोगाकडे दि.१६.१०.२००७ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये व्दितीय अपिल केले आहे. त्यांची सुनावणी दि.३.२.२००९ रोजी जळगांव येथे घेण्यांत आली. त्यावेळेला अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

अपिलार्थीनी दि.७.५.२००७ च्या अर्जान्वये सिटी सर्व्हे नं.२६७४ अ/१४ या मिळकतीचे एसआय फाईल मधील अर्ज,जाबजबाब, इत्यादिच्या नकलांची मागणी केली होती. परंतू मागणी केलेली माहिती पुरविता येत नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी दि.२८.६.२००७ च्या पत्राने अपिलार्थीना कळविल्याने व्यथित होऊन अपिलार्थीनी दि.१४.७.२००७ रोजी प्रथम अपिल केले. सदर अपिलाची दि.८.८.२००७ रोजी सुनावणी घेऊन मागणी केलेल्या माहितीपैकी नगर भूमापन क्र.२६७४ अ/१४ या मिळकत पत्रिकेवरील दि.१९.२.१९६४च्या नोंदीबाबत उपलब्ध कागदपत्रांच्या नकला अपिलार्थीना पुरविण्यांत येत असल्याचे व दुस-या नोंदीबाबतची कागदपत्रे शोधून त्याच्या नकला पुरविण्याबाबत नगर भूमापन अधिकारी, जळगांव यांना सुचना दिल्याचे दि.१८.९.२००७ रोजी आदेश पारीत करुन प्रकरण निकालात काढले. सदर निकालाने समाधान झाल्याने अपिलार्थीनी दि.१६.१०.२००७ रोजी आयोगाकडे व्दितीय अपिल केले आहे.

व्दितीय अपिलाच्या सुनावणीच्यावेळेला अपिलार्थी व संबंधित अधिकारी यांची बाजू समजून घेण्यांत आली. तसेच उपलब्ध कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली. अपिलार्थीनी मागणी केलेल्या माहितीपैकी जी माहिती उपलब्ध नसल्याने पुरविता येत नाही असे अधिका-यांनी नमूद केले आहे. त्या माहितीबाबतची नस्ती अपिलार्थीना तपासणीसाठी उपलब्ध करण्यांत यावी व त्या नस्तीतील ज्या कागदपत्राच्या प्रतीची अपिलार्थी मागणी करतील ती माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १० दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीना उपलब्ध करावी. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यांत येत आहेत.

-आदेश-

अपिल निकालात काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
दिनांक ३१ मार्च, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/ ३४०/०२

सौ.रत्नाबाई लक्ष्मण पाटील, अपिलार्थी
रा.चोपडा जिल्हा जळगांव

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा मुख्याध्यापक उत्तरवादी
नुतन माध्यमिक विद्यालय वाकळी शेंदणी
जिल्हा जळगांव

जन माहिती आधिकारी चेअरमन,
किसान बहुउद्‌देशीय शिक्षण
प्रसारक मंडळ वाकळी शेदणी मालखेडा,
जि.जळगांव.

## -विवेचन-

सौ.रत्नाबाई लक्ष्मण पाटील यांनी औरंगाबाद खंडपीठाकडे दि.२२.९.२००७ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये जे व्दितीय अपील केले त्या अपीलाची सुनावणी दि.३.२.२००९ रोजी जळगांव येथे घेण्यांत आली त्यावेळी अपिलार्थी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

अपिलार्थीनी दि.२८.३.२००७ च्या अर्जान्वये नुतन माध्यमिक विद्यालय, वाकळी, शेंदणी, मालखेडा, ता.चोपडा, जि.जळगांव येथील ९ विद्यार्थ्याचे लि.स.च्या प्रमाणित प्रती व अन्य दोन मुद्यांवर माहिती मागविली होती. त्यापैकी पहिल्या मुद्याच्या अनुषंगाने त्रयस्थ पक्षाने माहिती देण्यास नकार दिल्याने ती माहिती वगळता अन्य दोन मुद्यांवर माहिती दिल्याचे आयोगाकडील सुनावणीच्या वेळेला संबंधित जन माहिती अधिका-यानी नमूद केले.

जन माहिती अधिकारी यांनी माहितीसाठी आवश्यक शुल्क भरल्यानंतरही माहिती मिळाली नाही असे नमूद करुन दि.७.८.२००७ रोजी व्दितीय अपिल केले. व्दितीय अपिलात अधिकची माहिती मागितली व मुळ अर्जातील मागणीनुसार त्रयस्थ पक्षाची माहिती वगळता अन्य माहिती दिली असल्याने प्रथम अपिल फेटाळल्याचे सुनावणीच्या वेळेला नमूद करण्यांत आले. असे असले तरी माहिती दिली नाही असे नमूद करुन आयोगाकडे दि.२२.९.२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे.

व्दितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळेला अपिलार्थी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित होते. मागणी केल्याप्रमाणे तिन्ही मुद्यावरील माहितीसाठी अपिलार्थीनी मागणी केली. तसेच संस्थेवर दंडात्मक कार्यवाही करण्याची विनंती केली असे असले तरी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी त्रयस्थ पक्षाची माहिती सदर पक्षाने देण्यास नाकारल्याने दिली नसल्याचे व अन्य माहिती दिली असल्याचे सुनावणीच्या वेळेला नमूद केले.

अपिलार्थीनी मागितलेल्या माहितीपैकी पहिला मुद्दा त्रयस्थ पक्षाशी संबंधित असून त्या विद्यार्थ्याच्या पालकांनी माहिती देण्यास आक्षेप घेतल्याने माहिती देण्यास नकार देण्यांत आला आहे. त्यामुळे त्या मुद्यांवर माहिती देण्यांत आली नाही. सबब सदर अपिलाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यांत येत आहेत.

## -आदेश-

अपिल फेटाळण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
दिनांक ३१ मार्च २००९ — राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/ ४१४४/०२

श्री. चंद्रकांत विश्राम बंड,
४ अ/१४, भुदरगड, अपिलार्थी
आरटीओ चार बंगला जवळ, अंधेरी (प)
मुंबई ५३

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहमुख्य अधिकारी यांचे कार्यालय
म्हाडा, गृहनिर्माण भवन वांद्रे (पूर्व) उत्तरवादी
मंबई ५१

जन माहिती अधिकारी सहाय्यक भूव्यवस्थापक,बोरीवली
मुंबई मंडळ, गृहनिर्माण भवन
वांद्रे (पूर्व)मंबई ५१

-विवेचन-

श्री. चंद्रकांत विश्राम बंड, दि.९.२.२००९ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये जे व्दितीय अपील केले त्या अपीलाची सुनावणी दि.२.४.२००९ रोजी घेण्यांत आली त्यावेळी अपिलार्थी अनुपस्थित होते व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

श्री.चंद्रकांत विश्राम बंड यांनी जन माहिती अधिकारी,उपनिबंधक, सहकारी संस्था के/पश्चिम विभाग या कार्यालयाकडे दि.१.९.२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये अर्ज दाखल केलेला होता सदरचा अर्ज हाविहित नमुन्यात नसल्याने व तयास रु.१०/-चा कोर्ट फी स्टॅम्प लावलेला नसल्याने तसेच भुदरगड तालुका को ऑप हौसिंग सोसायटी लिमिटेड या संस्थेच्या दि.९.७.१९८३ रोजीच्या कायदा कलम ८३ व ८८ च्या चौकशी बाबतचे आदेश व त्याबाबत केलेल्या कारवाईबाबत माहितीची मागणी श्री.बंड यांनी केलेली होती. परंतू या कार्यालयातील धारीका दि.२६ जुलै २००५ रोजी झालेल्या अतिवृष्टीमध्ये नष्ट झालेली असल्याने सदरची माहिती या कार्यालयात उपलब्ध नसल्याबाबतचे त्यांना दि.१७.९.२००८ रोजीच्या पत्रान्वये कळविलेले आहे व त्याचा अर्ज त्या कार्यालयाचे स्तरावर निकाली काढण्यांत आला.

या विरुध्द श्री. बंड यांनी मा.जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (३)मुंबई यांचे कडे अपिल दाखल केले होते. सदर अपिलाच्या अनुषंगाने जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (३)तथा अपिलीय अधिकारी यांनी श्री.चंद्रकांत बंड यांचे अपिल दि.१२.१२.२००८ रोजीच्या आदेशाने अंशत: मान्य केले होते. त्यांनी दिलेल्या आदेशानुसार अपिलकार यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देणेबाबत दि.९.१.२००९ रोजीच्या पत्रान्वये संस्थेस सूचना दिलेल्या आहेत. व श्री.बंड यांनाही संस्थेकडून सदरची माहिती प्राप्त करन घेणेबाबत कळविलेले आहे. संस्थेने दि.२७.१.२००९ च्या पत्रान्वये का. कलम.८३ खालील चौकशी अहवालाची प्रत या कार्यालयास जन माहिती अधिकारी कार्यालयात करुन दिली आहे. श्री.बंड यांना कार्यालयात कलम८३ च्या अहवालाची प्रत दाखविण्यांत आली. तथापि त्यांनी कलम ८३ चा अहवाल आपल्यास नको असून कलम८८ खाली कारवाई केली असल्यास त्याचा तपशिल मागितला. तथापि कलम८८ अन्वये कारवाई झालेली नाही. त्यामुळे त्यांना कलम ८८ खाली अहवालाची प्रत देता आली नाही, असे सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी सांगितले.

अपिलार्थी अनुपस्थित असल्यामुळे त्यांचे म्हणणे समजून घेता आले नाही. त्यामुळे पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

**-आदेश-**

अपिल निकालात काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २ एप्रिल २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/ ४१४७/०२

श्री.लालजी रामरक्षा मिश्रा — अपिलार्थी
जयभवानी चाळ, आनंद नगर,
ओशिवरा, जोगेश्वरी

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा पोलिस उपआयुक्त — --उत्तरवादी
परिमंडळ-९, वांद्रे (प) मुंबई ५०

जन माहिती आधिकारी सहाय्यक पोलिस आयुक्त,
परिमंडळ-९, वांद्रे (प) मुंबई ५०

-विवेचन-

श्री.लालजी रामरक्षा मिश्रा यांनी आयोगाकडे दि.१३.१.२००७ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये व्दितीय अपिल केले आहे. त्यांची सुनावणी दि.४.४.२००९ रोजी येथे घेण्यांत आली. त्यावेळेला अपिलार्थी अनुपस्थित होते व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना दि.१३.१०.२००८ रोजी प्रथम अपिलीय आदेशानुसार विकासक यांच्या जबाबदा-यामध्ये नमूद केलेल्या शिफ्टीगबाबतची प्रत अपिलार्थी यांना देण्याबाबत आदेश दिले होते. परंतू ती प्रत अपिलार्थी यांना अजुनही मिळालेली नाही हा अपिलार्थी यांचा मुद्दा आहे.

याबाबत सुनावणीच्या वेळेला शिफ्टींगची प्रत ही रेकॉर्डमध्ये कधी नसल्यामुळे अर्जदाराच्या मागणीप्रमाणे उपलब्ध करुन देता येत नाही असे असे सुनावणीच्या वेळी सांगितले. जे कागदपत्र

रेकॉर्डमध्ये कधीच नव्हते ते उपलब्ध करुन देता येणार नाही हे मान्य करण्यांत येत आहे. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

-आदेश-

अपिल निकालात काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ४ एप्रिल २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/ ४१४८/०२

श्री.दिपक दत्ताराम कदम, अपिलार्थी
१४७/८६ दिग्विजय मिल्स चाळ,
दत्ताराम लाल मार्ग, काळा चौकी, मुंबई.४०० ०३३

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा पोलिस उपआयुक्त** **--उत्तरवादी**
**परिमंडळ-३, यांचे कार्यालय, बी.ए.रोड.**
**बावळा कपाऊंड,भायखळा, मुंबई ४००८**

**जन माहिती आधिकारी सहाय्यक पोलिस आयुक्त**
**मध्यनियंत्रण कक्ष,**
**परिमंडळ-३, यांचे कार्यालय, बी.ए.रोड.**
बावळा कपाऊंड,भायखळा, मुंबई ४००८

**-विवेचन-**

**श्री.दिपक दत्ताराम कदम,यांनी आयोगाकडे दि.१०.२.२००७ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये व्दितीय अपिल केले आहे. त्यांची सुनावणी दि.४.४.२००९ रोजी येथे घेण्यांत आली. त्यावेळेला अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.**

**अर्जदारास देण्यांत आलेली माहिती पुढीलप्रमाणे आहे:-**

| अ.क्र | माहितीचा विषय | काळाचौकी पोलिस ठाणेचा तपशिल |
|---|---|---|
| १ | **माझ पत्नी ज्योती दिपक कदम हिने दिनांक २८.११.२००५ रोजी रात्री ९.०० वाजता स्वतःच्या घरी स्वःखुशीने आई वडिलासमवेत जाण्यासाठी दिलेली लेखी सत्य प्रत मिळावी. तसेच जाताना माझ्या घरुन नेलेले दागिने,साडया, ड्रेस,मुलांचे कपडे,शाळेची सर्टीफिकेट, फी वा त्या मुलांची व स्वतःची के.ई.एम.हॉस्पीटलची फाईल हया सर्व सामानाची पोच पावती मिळावी ही नम्र विनंती हया सर्व प्रती मला कौटूंबिक न्यायालयामध्ये सादर करावयाच्या आहेत.** | **काळाचौकी पोलिस ठाणेचा उपलब्ध अभिलेख तपासला असता अर्जदाराने मागणी केलेल्या कागदपत्रासंदर्भात या पोलिस ठाणेत अदखलपात्र गु.नो.क्र. १५५३/०५ दि.२८.११.२००५ अन्वये नोंद आढळली. या व्यतिरिक्त कुठलीही नोंद आढळून आलेली नाही.**<br>**अदखलपात्र गु.नो.क्र.१५५३/ ०५ दि.२८.११.२००५ अन्वये नोंदची प्रत सोबत जोडलेली आहे.** |

**अर्जदाराला मात्र नमूद केलेल्या सामानाची यादी पाहिजे आहे. मात्र अशा प्रकारची यादी ही तयारच करण्यांत आली नसल्यामुळे ती माहिती पोलिस स्टेशनमध्ये उपलब्ध नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी सांगितले.**

**अर्जदारास हवी असलेली माहिती रेकॉर्डला उपलब्ध नव्हती त्यामुळे ती देता येत नाही, हे म्हणणे मान्य करण्यांत येत आहे. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत आहे.**

**-आदेश-**

**अपिल अमान्य करण्यांत येत आहे**

(डॉ.सुरेश वि.जोशी)

दिनांक ४ एप्रिल २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/ ४१४८/०२

श्री.शरदचंद्र एच,गर्कल, अपिलार्थी
१२ डी. स्नेहसदर हिल रोड,
चुनाभट्टी,मुंबई २२

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपसचिव --उत्तरवादी
नगर विकास विभाग,नाजकधा-१
मंत्रालय,मुंबई ३२

जन माहिती आधिकारी सहाय्यक कक्ष अधिकारी
नगर विकास विभाग,नाजकधा-१
मंत्रालय,मुंबई ३२

-विवेचन-

श्री.शरदचंद्र एच,गर्कल यांनी आयोगाकडे दि.९.२.२००७ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये व्दितीय अपिल केले आहे. त्यांची सुनावणी दि.४.४.२००९ रोजी येथे घेण्यांत आली. त्यावेळेला अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशात अपिलीय अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे आदेश दिलेले होते.

" श्री.शरदचंद्र एच. गरकल यांनी दि.५.९.२००८ अन्वये केलेल्या अर्जात अपेक्षिलेल्या सन १९९८ पासूनच्या स्वेच्छाधिकार कोटयातून सदनिका वाटपाबाबतची माहिती अप्पर जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, बृहन्मुंबई नागरी समूह यांनी विनाशुल्क १५ दिवसांत उपलब्ध करुन द्यावी. सदर माहिती अप्पर जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, बृहन्मुंबई नागरी समूह यांच्याकडून विहित कालावधीत अपिलकारास देण्यांत येईल या संदर्भात माहिती अधिकारी तथा अवर सचिव (नाजकधा-१) यांनी जातीने पहावे "

या आदेशाची प्रत ही अप्पर जिल्हाधिकारी यांनाही देण्यांत आलेली होती. मात्र सुनावणीच्या वेळेला अपिलार्थी यांना हवी असलेली माहिती अप्पर जिल्हाधिकारी यांनी दिलेली नाही असे निर्दशनास आणले. तेव्हा अप्पर जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी बृहन्मंबई नागरी समूह,वांद्रे.मुंबई यांचेकडून प्रथम अपिलीय दि.२८..११.२००९ च्या आदेशाचे पालन व्हावे व अपिलीय अधिकारी यांनी त्याचे पालन करुन घ्यावे. तसेच अर्जदारास अप्पर जिल्हाधिकारी यांनी प्रथम अपिलीय आदेश प्राप्त झाल्यानंतर सुध्दा माहिती देण्याची कार्यवाही न केल्याबद्दल त्यांच्यावर अधिनियमाच्या कलम २० अन्वये शास्तीची कारवाई कां करण्यांत येऊ नये? याचा खुलासा त्यांनी अपिलीय अधिकारी तथा उपसचिव, नगर विकास यांच्यामार्फत आयोगाकडे दि.२४ एप्रिल २००९ पर्यत पाठवावा. या आदेशाची प्रत अप्पर जिल्हाधिकारी यांना त्वरीत द्यावी व त्यांच्या खुलाशाच्या उत्तरावर अपिलीय अधिकारी यांनी आपले अभिप्राय नोंदवून खुलासा आयोगास सादर करावा. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

**-आदेश-**

अपिल अंशत: मान्य करण्यांत येत आहे. वर निर्देशिल्याप्रमाणे कार्यवाही करावी तसेच अप्प्रर जिल्हाधिकारी यांचा खुलासा उपसचिव, नगर विकास यांनी आपल्या अभिप्रायासह आयोगास सादर करावा.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ४ एप्रिल २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/ ४१४९/०२

श्री.वैभव सदानंद पालकर, अपिलार्थी
५४/१३४५, कन्नमवार नगर-१
विक्रोळी (पूर्व)मुंबई ८३

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहायक मनपा आयुक्त --उत्तरवादी
सहाय्यक आयुक्त बृहन्मुंबई मनपा कार्यालय,
एस. विभाग, २ रा मजला, २०१/२०२, ला.ब.शास्त्री मार्ग,
मंगतराम पेट्रोलपंप जवळ, भांडूप, मुंबई

जन माहिती आधिकारी सहायक कर निर्धारक व संकलक एस विभाग
सहाय्यक आयुक्त बृहन्मुंबई मनपा कार्यालय,
एस. विभाग, २ रा मजला, २०१/२०२, ला.ब.शास्त्री मार्ग,
मंगतराम पेट्रोलपंप जवळ, भांडूप, मुंबई

-विवेचन-

श्री.वैभव सदानंद पालकर,यांनी आयोगाकडे दि.२.२.२००७ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये व्दितीय अपिल केले आहे. त्यांची सुनावणी दि.४.४.२००९ रोजी येथे घेण्यांत आली. त्यावेळेला अपिलार्थी अनुपस्थित होते व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपिलार्थीना म्हाडाच्या इमारतीबाबतीत मालमत्ता कर भरण्याची जबाबदारी कोणाची ही व इतर माहिती विचारली होती. एका हॉटेलचा भौगोलिक पत्ता देऊन त्याचा मालमत्ता कर कोण भरते ?याची माहिती विचारली होती.

प्रश्न क्र.१ ते ४ मालमत्ता कर पूर्तता कोण करते? याची माहिती अधिनिमयाच्या कलम २ (च)नुसार माहितीच्या संज्ञेत देता येत नाही. तसेच मुद्दा क्र.५ च्या संदर्भात मालमत्ता क्रमांक कळविल्यास माहिती देता येईल, असे अर्जदारास कळविण्यांत आले होते. वरील निर्णयानंतर प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या दि.१६.१२.२००८ रोजीच्या आदेश कायम करण्यांत आले. त्याविरुध्दचे हे व्दितीय अपील आहे.

माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार माहिती मागण्यासाठी प्रश्न विचारताच येणार नाही असे नाही, प्रश्नाच्या अनुषंगाने जे कागदपत्र उपलब्ध असतील ते कागदपत्र उपलब्ध करुन दिले तरी योग्य ठरु शकते. त्या दुष्टीने अर्जदाराच्या प्रश्न क्र.१ ते ४ च्या अनुषंगाने जे कागदपत्र उपलब्ध असतील ते अर्जदारास उपलब्ध करुन देण्यांत यावेत तसेच मुद्दा क्र.५ च्या बाबत अर्जदाराने संबंधित विभागाकडे संपर्क साधल्यास या त्रयस्थ मालमत्तेसंबंधीत आणखी भौगोलिक माहिती घेऊन मालमत्ता कराबाबत माहिती मिळू शकेल. तसेच अर्जदाराने याबाबत जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधावा. तसेच जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास हवी असणारी माहिती १५ दिवसाचे आत उपलब्ध करुन देण्यांत यावी असे निर्देश देण्यांत आले मुद्दा क्रमांक ५ च्या बाबतीत कलम ११ नुसार कार्यवाही करुन अर्जदारास माहिती देण्यात यावी असेही निर्देश देण्यांत आले. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

**-आदेश-**

अपिल निकालात काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ४ एप्रिल २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/ ४१५४/०२

श्री.इब्राहीम हाजी जुनस — अपिलार्थी
८८/१२, कोलेस रोड,
बंगलोर ५६०००५

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा जन माहिती आधिकारी — --उत्तरवादी
सहायक मनपा आयुक्त सहाय्यक आयुक्त बृहन्मुंबई मनपा कार्यालय,
बी वॉर्ड, १२१ रामचंद्र भट मार्ग, बाभुला टॅक,
क्रॉस लेन, मुंबई ४०० ००९

-विवेचन-

श्री. इब्राहीम हानी युनूस यांनी आयोगाकडे दि.१०.२.२००९ रोजी व्दितीय अपिल सादर केले त्या अपिलाची सुनावणी दि.४.४.२००९ रोजी घेण्यांत आली. अपिलार्थी, अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अर्जदारास प्रॉपटी टॅक्सची रक्कम मालकाने व भाडेकरुने कशा पध्दतीने द्यावयाची असते याबाबतची माहिती पाहिजे होती व अर्जदाराच्या म्हणण्यानुसार ही आकडेवारी तयार करीत असताना नविन रेंट ॲक्टच्या तरतूदीचा विचार करण्यांत आलेला नाही, अशी अर्जदाराची अशी तक्रार आहे तर अर्जदाराने संबंधित कायदयाखाली संबंधित प्राधिकरणाकडे दाद मागावी. माहितीचा

अधिकारांतर्गत जन माहिती अधिका-याकडे जी  माहिती उपलब्ध आहे ती माहिती अर्जदारास देण्यांत आलेली आहे असे दिसून आले.  सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

-आदेश-

अपिल अमान्य करण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ६ एप्रिल २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/ ४१८१/०२

श्री.विनोद सी. संपत — अपिलार्थी
२०१ श्रीमद दर्शन प्लॉट नं.९२
२ रा मजला, टिळक रोड लॉयन्स गार्डन
श्रीमद रामचंद्रा लेन, घाटकोपर (पू)
मुंबई ४०० ०७७

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहायक मनपा आयुक्त — --उत्तरवादी
सहाय्यक आयुक्त बृहन्मुंबई मनपा कार्यालय,
जोबनपुत्र कपाऊंड डी वॉर्ड कार्यालय,
नाना चौक, ग्रॅंट रोड (प)मुंबई ४०० ००७

जन माहिती आधिकारी सहायक अभियंता (इ व का)
सहाय्यक आयुक्त बृहन्मुंबई मनपा कार्यालय,
जोबनपुत्र कपाऊंड डी वॉर्ड कार्यालय,
नाना चौक, ग्रॅंट रोड (प)मुंबई ४०० ००७

-विवेचन-

श्री.विनोद सी. संपत यांनी आयोगाकडे दि.९.२..२००९ रोजी व्दितीय अपिल सादर केले त्या अपिलाची सुनावणी दि.१५.४.२००९ रोजी घेण्यांत आली. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

सुनावणीच्यावेळी असे दिसून आले की, दि.२८.४.२००८ तसेच दि.२६.५.२००८ या दोन्ही अर्जाच्याबाबतीत अर्जदारास माहिती देण्यांत आलेली आहे. मात्र दि.२८.४.२००८ रोजीच्या अर्जाची माहिती मिळाली नाही असे अर्जदाराचे म्हणणे आहे. ती माहिती पाठविण्यांत आली होती हे दर्शविणारा पुरावा उपलब्ध असल्यामुळे ती माहिती पुन्हा अर्जदारास देण्याचे निर्देश देण्यांत आलेत. त्याचपमाणे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, इमारत प्रस्ताव, डी विभाग, मनपा तसेच संबंधित कार्यकारी अभियंता, इमारत प्रस्ताव या दोघांच्या कार्यालयातील रेकॉर्डचे अवलोकन अर्जदाराने करुन त्यांना हवी असलेली माहिती त्यांनी प्राप्त करुन घेतलेली आहे. त्यामुळे माहिती देण्याच्या बाबतीत जन माहिती अधिकारी यांनी योग्यती कार्यवाही केल्याचे दिसून येते. एखाद्या मुद्याबाबतचे मत हे रेकॉर्डमध्ये आधीपासून उपलब्ध असेल तर ते अधिनियमाच्या तरतूदीच्या आधीन राहून अर्जदारास देता येईल. परंतू "एखाद्या मुद्याबाबत काय मत असेल" अशी जर माहिती पाहिजे असेल तर ते मत देण्यास जन माहिती अधिकारी बांधील नाही. सबब पुढील आदेश देण्यांत येत आहे.

-आदेश-

अपिल अमान्य करण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)

दिनांक १४ एप्रिल २००९

राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/ ४१८४/०२

श्री. अनिल वेदव्यास गलगली — अपिलार्थी
२, जुनी खारवाला चाळ,काजूपाडा,
साकीनाका, मुंबई ४०० ०७२

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, — --उत्तरवादी

(इमारत प्रस्ताव) बृहन्मुंबई मनपा,
विक्रोळी (प)मुंबई ८३

जन माहिती आधिकारी कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव)
(इमारत प्रस्ताव) बृहन्मुंबई मनपा,
विक्रोळी (प)मुंबई ८३

-विवेचन-

श्री. अनिल वेदव्यास गलगली यांनी आयोगाकडे दि.२१.२..२००९ रोजी व्दितीय अपिल सादर केले त्या अपिलाची सुनावणी दि.१५.४.२००९ रोजी घेण्यांत आली. अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

या अपिलाव्दारे अर्जदाराने शहर व उपनगरातील सिमेंट प्लॅन्ट (रेडिमिक्स)बाबत माहिती पाहिजे होती. अशा स्वरुपाची अनेक अपिले व अर्ज यापूर्वी अर्जदाराने आयोगास सादर केलेली आहेत व ती अपिले आयोगाने ऐकलेली आहेत. त्या संदर्भात अर्जदाराना " कागदपत्रे दाखविण्यांत यावीत "असे निर्देश देण्यांत आलेले आहेत. त्यानुसार अर्जदाराने दि.६.४.२००९ रोजी पूर्व उपनगर येथील कागदपत्राची पाहणी करुन त्यांना हवी असलेली कागदपत्रे प्राप्त करुन घेतलेली आहेत, असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीवेळी सागितले. कदाचित त्यामुळेच अपिलार्थी सुनावणीस उपस्थित राहिले नसावेत. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहे.

-आदेश-

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १४ एप्रिल २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/ ४१८३ /०२

श्री. अच्छवानूर मोहमद इस्माईल घांची --अपिलार्थी
युसूफ इब्राहीम गार्डी इमारत, ३ रा मजला,
खोली क्र.१६,१८,१९,७, इरस्वीन रोड,मंबई ४३

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा पोलिस उपआयुक्त, ,(मुख्यालय-१)
पोलिस आयुक्त कार्यालय, --उत्तरवादी
क्रॉफर्ड मार्केट, मुंबई ४०० ००८

जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलिस आयुक्त्,(मुख्यालय-१)
पोलिस आयुक्त कार्यालय,
क्रॉफर्ड मार्केट, मुंबई ४०० ००८

-विवेचन-

श्री. अच्छवानूर मोहमद इस्माईल घांची यांनी आयोगाकडे दि.२.३..२००९ रोजी व्दितीय अपिल सादर केले त्या अपिलाची सुनावणी दि.१५.४.२००९ रोजी घेण्यांत आली. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अर्जदारांना जी माहिती पोलिसांच्या विशेष शाखेकडून पाहिजे आहे त्या शाखेत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २४ (४)अन्वये तसेच शासन अधिसूचना क्र. सीआरआयटी/२००५/सीआर/२६५/०५ दिनांक .११.१०.२००५ नुसार अधिसूचनेच्या तरतूदीतून वगळण्यांत आलेले आहे. अर्जदाराला जी माहिती पाहिजे होती ती नाकारण्याचा निर्णय योग्य आहे. मात्र अर्जदाराने असे सांगितले की, त्यांना ज्या कामासाठी माहिती पाहिजे आहे ती केस लघुवाद कोर्टात चालू आहे. सदर माहितीची आवश्यकता जर कोर्टास आवश्यक वाटते तर त्याबाबत कोर्ट त्याबाबत निर्णय घेईलच. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहे.

-आदेश-

अपिल अमान्य करण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १४ एप्रिल २००९

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्रमांक २००९/ ४१८७ /०२**

**श्री.नितीन हरिश्चंद्र पांचाळ --अपिलार्थी**
**सहार रोड, कोलडोंगरी गल्ली नं.१,**
**वडारवाडा अंधेरी (पूर्व)मुंबई ४०००६९**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहमुख्य अधिकारी (मुंबई मंडळ)**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, - उत्तरवादी**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व)**
**मुंबई ४०० ००५१**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.भुव्यवस्थापक,अंधेरी**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व)**
**मुंबई ४०० ००५१**

**-विवेचन-**

**श्री.नितीन हरिश्चंद्र पांचाळ यांनी आयोगाकडे दि.१८.२..२००९ रोजी व्दितीय अपिल सादर केले त्या अपिलाची सुनावणी दि.१५.४.२००९ रोजी घेण्यांत आली. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.**

**मौजे गुंदवली येथील नं.भु.क्र.४४७प. व ४४७/१अ वरील संत ज्ञानेश्वर सहकारी गृहनिर्माण संस्था भाग-२ मध्ये श्रीमती सुलोचना हरिश्चंद्र पांचाळ यांच्या ऐवजी श्रीमती सुलोचना लॉरेन्स पीटर यांना पात्र दाखविण्यांत आले. अर्जदाराने श्रीमती सुलोचना ह.पांचाळ यांना अपात्र दाखविल्याबाबत माहितीच्या अधिकाराखाली अर्ज केला होता व त्यानुसार अर्जदारास श्रीमती सुलोचना ह. पांचाळ यांना अनावधानाने अपात्र ठरविण्यांत आलेले आहे, असे कबुलीचे पत्र अर्जदारास पाठविलेले आहे. हया चुकीची दुरुस्ती होण्याबाबत अर्जदाराने अर्ज केला असता, ती चुकीची दुरुस्ती अद्याप झालेली नाही. मात्र झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरणाने संत ज्ञानेश्वर सह.गृह. संस्थेचे परिशिष्ट-२ मुंबई मंडळाकडे पुर्नतपासणीसाठी पाठविलेले आहे. सदर पुर्नतपासणीचे वेळी सदरहू चुकीची दुरुस्ती करण्यांत येईल असे अर्जदारास कळविले आहे. संबंधित पुर्नतपासणी अंतिम टप्प्यात असून सुधारित परिशिष्ट-२मध्ये श्रीमती सुलोचना ह. पांचाळ यांना पात्र ठरविण्यांबाबतची कार्यवाही प्रस्तावित आहे असेही जन माहिती अधिकारी यांनी आयोगाला दिलेल्या अहवाल नमूद केले आहे, ही कार्यवाही शक्य तितक्या लवकर म्हणजेच १५दिवसाचे आत पूर्ण करीत असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. अर्जदारास माहितीपेक्षा कृतीची अपेक्षा आहे. सबब पुढील प्रमाणे आदेश देत आहे.**

**-आदेश-**

**अपिल निकाली काढण्यांत येत आहे.**

(डॉ.सुरेश वि.जोशी)

दिनांक १५ एप्रिल २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/ ४१४६ /०२

श्री.सोनमोन अे.पिल्लई, अपिलार्थी
रोकडिया चाळ रुम नं.७,यारी रोड, वर्सोवा,
अंधेरी, (प),मंबई-६१

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा महापालिका चिटणीस
महानगर पालिका चिटणीस कार्यालय, - उत्तरवादी
मनपा मुख्यालय,विस्तारीत इमारत, १ ला मजला,
मनपा मार्ग, मुंबई-०१

जन माहिती अधिकारी तथा महापालिका चिटणीस
महानगर पालिका चिटणीस कार्यालय,
मनपा मुख्यालय,विस्तारीत इमारत, १ ला मजला,
मनपा मार्ग, मुंबई-०१

-विवेचन-

अपिलार्थी श्री.सोनमाने अे. पिल्लई यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३)अन्वये राज्य माहिती आयोग, मुंबईकडे दि.४.२.२००९ रोजी व्दितीय अपील केले आहे. त्यामध्ये असे नमूद केले आहे की, अपिलार्थीनी दि.१७.९.२००८ च्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीनी महापौरांना लिहिलेल्या दि.१४.८.२००७ च्या अर्जाच्या सांक्षाकित प्रती मिळाव्यात त्या प्रती न मिळाल्याने व्यथित होऊन आयोगाकडे व्दितीय अपिल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी दि.२.४.२००९ रोजी आयोगाच्या कार्यालयात आयोजित केली होती. त्यावेळेला अपिलार्थी व विद्यमान जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपिलार्थीनी दि.१६.९.२००७ तारीख असलेला कलम ६ च्या अर्जान्वये त्यांनी चुकीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीनी महापौरांना लिहिलेल्या दि.१४.८.२००७ च्या अर्जाच्या सांक्षाकित प्रतींची मागणी केली होती. (अपिलार्थीचा दि.१६.९.२००८ चा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दि.१७.९.२००८ रोजी प्राप्त झाल्याची नोंद आहे.) अर्जदाराची अर्जावर दि.१६.९.२००७ ही तारीख लिहिण्यांत चुक झाली आहे ती तारीख दि.१६.९.२००८ पाहिजे. कारण कोर्ट फी स्टॅम्पवरील तारखेचा शिक्का दि.१०९.२००८ चा आहे. म्हणजेच अर्ज २००७ सालचा असू शकत नाही.

अपिलार्थीचा दि.१४.८.२००७ चा अर्ज जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.२१.८.२००८ च्या पत्रान्वये सहाय्यक आयुक्त, के/पश्चिम विभाग यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित केल्याचे दि.१४.१०.२००८ च्या पत्रान्वये अपिलार्थीना कळविले. सदर उत्तराने व्यथित होऊन अपिलार्थीनी दि.३.११.२००८ रोजी प्रथम अपिल केले. सदर अपिलाची सुनावणी दि.२०.११.२००८

रोजी घेण्यांत आली. त्यावेळी उपस्थित अधिका-यानी अपिलार्थीनी मागणी केलेले दि.१४.८.२००७ चे पत्र के/पश्चिम विभागाच्या सहायक आयुक्तांकडे पाठविले असल्याने सदर पत्राची प्रत जन माहिती अधिका-यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याचे प्रतिपादन केले. त्यावर सदर पत्राची प्रत न्यायालयात सादर करावयाची असल्याचे तसेच सदर पत्राची प्रत आपल्या कार्यालयात उपलब्ध नसल्यास तसे प्रथम अपिलीय अधिका-यांच्या आदेशात नमूद केले तरी चालेल असे प्रतिपादन अपीलार्थी यांनी केल्याने प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.११.१२.२००८ च्या त्यांच्या आदेशात नमूद करुन जन माहिती अधिकारी यांच्या दि.१४.१०.२००८ च्या पत्रात अपिलार्थीना दिलेली माहिती योग्य असल्याचे ग्राहय धरले तसे दि.१४.८.२००७ चे पत्र के/पश्चिम विभागाच्या सहाय्यक आयुक्तांकडे पुढील योग्यत्या कार्यवाहीसाठी अग्रेषित केले असल्यामुळे सदर पत्राची प्रमाणित प्रत देणे शक्य नसल्याचे नमूद करुन अपिल दि.११.१२.२००८ च्या आदेशान्वये निकालात काढले.

आयोगाकडील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांची बाजू ऐकून घेण्यांत आली. तसेच दोन्ही पक्षकारांना सादर केलेली निवेदने व आयोगाकडे उपलब्ध असलेली कागदपत्रे यांची तपासणी करण्यांत आली.

जर अर्जदाराने मागितलेली माहिती जन माहिती अधिका-याच्या कार्यालयात नव्हती व ती के/पश्चिम विभाग कार्यालयात होती तर जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराचा कलम ६ खालील अर्ज हा स्वत: होऊन के/पश्चिम वॉर्डच्या जन माहिती अधिका-याकडे पाठवावयास पाहिजे होता. पण तसे केले नाही. तेव्हा सर्व प्रथम महानगर पालिका चिटणीस कार्यालयाच्या जन माहिती अधिकारी यांनी हा अर्ज के/पश्चिम कार्यालयाच्या जन माहिती अधिका-याकडे पाठवावा व आधीच होऊन गेलेला उशिर लक्षात घेता त्या जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास ७ दिवसांचे आत माहिती पाठवावी.

वास्तविक पाहता वर मी आता दिलेले आदेश प्रथम अपिलीय अधिकारी हे हि देऊ शकले असते. पण जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी या दोघांनीहि माहितीचा अधिकार अधिनियम नीट वाचलेला दिसत नाही. त्यामुळे आपल्याकडे ही माहिती नाही हे कळविणे हे पुरेसे झाले असे त्यांना वाटते जे चुकीचे आहे. त्याबद्दल या दोन्ही अधिका-यांना यापुढे जागरुक राहण्याची समज देण्यांत येत आहे.

या आदेशाची प्रत ही के/पश्चिम वॉर्डच्या जन माहिती अधिकारी यांनाहि देण्यांत यावी.

**-आदेश-**

अपील मान्य करण्यांत येत आहे.

चिटणीस कार्यालयाच्या जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराचा कलम ६ चा अर्ज के/पश्चिम वॉर्डच्या जन माहिती अधिका-याकडे पाठवावा व त्यावर अपिलार्थीना माहिती ७ दिवसाचे आत देण्यांत यावी.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १५ एप्रिल २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/ ४१९५ /०२

श्री.महेश गणपत मोरे, — अपिलार्थी
जी ब्लॉक, ३ रा मजला, रुम नं.१८
बने कपाऊंड, साने गुरुजी मार्ग,
ताडदेव, मुंबई ४०० ०३४

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहायक मनपा आयुक्त --उत्तरवादी
सहाय्यक आयुक्त बृहन्मुंबई मनपा कार्यालय,
जोबनपुत्र कपाऊंड डी वॉर्ड कार्यालय,
नाना चौक, ग्रॅट रोड (प)मुंबई ४०० ००७

जन माहिती आधिकारी सहायक अभियंता (इ व का)
सहाय्यक आयुक्त बृहन्मुंबई मनपा कार्यालय,
जोबनपुत्र कपाऊंड डी वॉर्ड कार्यालय,
नाना चौक, ग्रॅट रोड (प)मुंबई ४०० ००७

-विवेचन-

श्री.महेश गणपत मोरे यांनी आयोगाकडे दि.२७.२..२००९ रोजी व्दितीय अपिल सादर केले त्या अपिलाची सुनावणी दि.२०.४.२००९ रोजी घेण्यांत आली. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

बने कपाऊंड येथील इमारत " ए "ब्लॉक च्या जनरल सेक्रेटरी महापालिका वसाहत, दोंदे नगर यांना वाटप करण्यांत आलेल्या जमिनीविषयी व त्यावर झालेल्या बांधकामाविषयी माहिती दि.१७.११.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे पाहिजे होती. अर्जदाराना यातील उपलब्ध माहिती दि.६.१२.२००८ रोजी दिलेली आहे त्या माहितीने समाधान न झाल्याने केलेल्या पहिल्या अपिलाच्या निर्णयात अर्जदाराने हव्या असलेल्या कागदपत्राचे निरिक्षण करावे व त्यांना हव्या असलेल्या कागदपत्राच्या प्रती देण्यांत याव्यात, असा निर्णय दिला त्याविरुध्दचे सदरचे हे अपिल आहे.

ज्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कडील माहिती दिलेली आहे व त्याने अपिलार्थीचे जर समाधान होत नसेल तर अपिलार्थीने संबंधित नस्तीचे अवलोकन करावे व त्यांना हव्या असलेल्या कागदपत्राच्या प्रती त्यांनी प्राप्त करुन घेणे उचित ठरले असते.

अर्जदाराने त्यांना हव्या असलेल्या माहितीच्या नस्तीचे अवलोकन करावे व त्यांना हव्या असलेल्या कागदपत्राच्या प्रती त्यांना देण्यांत याव्यात, असे निर्देश देण्यांत येत आहेत. जर अर्जदारास या जमिनीवरील बांधकामासंबंधी माहिती पाहिजे असेल तर सदर माहिती महापालिकेच्या इस्टेट विभागाकडे नसल्यामुळे त्या विभागाने अर्जदाराचा अर्ज महापालिकेच्या सबंधीत विभागाकडे पाठवावा व त्यांच्याकडे या वरील बांधकामाबाबत प्रस्ताव प्राप्त झाला असल्यास त्यासंबंधीची माहिती अर्जदारास

द्यावी, तसेच याबाबत प्रस्ताव संबंधित विभागाकडे मान्यतेसाठी आलेला नसल्यास तसे अर्जदारास स्पष्टपणे कळवावे. सबब पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

-आदेश-

अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.

वर निर्देशिल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि.जोशी)

दिनांक २० एप्रिल २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/ ४१९७ /०२

श्री.तुषार द.म्हात्रे -अपिलार्थी
रामकुटी एल.बी.रोड,
विठ्ठलपाडा,चिंचवली, मालाड (प)
मंबई -६४

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा पोलिस उपआयुक्त --उत्तरवादी
परिमंडळ-१२ शैलेद्र नगर, दहिसर (पूर्व)

जन माहिती आधिकारी सहायक पोलिस आयुक्त
उत्तर नियंत्रण कक्ष, ठाकूर व्हिलेज,
कांदिवली (पूर्व) मुंबई ४०० १०१

-विवेचन-

श्री.तुषार द.म्हात्रे यांनी आयोगाकडे दि.२४.२..२००९ रोजी व्दितीय अपिल सादर केले त्या अपिलाची सुनावणी दि.२०.४.२००९ रोजी घेण्यांत आली. अपिलार्थी अनुपस्थित होते व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अर्जदार श्री.तुषार म्हात्रे यांनी दि.३.१२.२००८ रोजी जन माहिती अधिकारी कार्यालयात माहिती मिळण्यासाठी अर्ज सादर केला त्यात त्यांनी १) मालाड पोलिस ठाणे येथे नेमणूकीस असलेले अधिकारी व अंमलदार यांचे संपूर्ण नांव, हुद्दा,शिक्षण, जात/धर्म, राहण्याचे ठिकाण, पोलिस ठाणेस हजर दिनांक, त्यांनी केलेले प्रशिक्षण इत्यादि. २) दि.२४.११.२००८ रोजी पहाटे ००.३१ वा. विठ्ठलपाडा, मालाड-पश्चिम येथे मोबाईल व्हॅनमधून कोण-कोण पोलिस अंमलदार आले होते तसेच ३. दि.२४.११.२००८ रोजी अर्जदारांनी मालाड पोलिस ठाणे येथे दाखल केलेल्या अदखलपात्र गुन्हयाच्या प्रतीची मागणी केलेली होती.

वर नमूद प्रमाणे अर्जदारांनी मागणी केलेली माहिती ही मालाड पोलीस ठाण्याकडून प्राप्त करण्यांत आली. त्यात मुद्दा क्र.२ व ३ बाबत माहिती देण्यांत आली व मुद्दा क्र.१ बाबतची माहिती ही माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ (ड)चे तरतूदीनुसार नाकारण्यांत आली. अर्जदारांनी दि.१५.१२.२००८ रोजीची तयार माहिती ही दिनांक २९.१२.२००८ रोजी स्विकारली.

अर्जदार यांना दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने त्यांनी दि.१७.९.२००९ रोजी मा.अपिलीय अधिकारी व पोलिस उप आयुक्त परि-१२ यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले. त्याची सुनावणी दि.३०.१.२००९ रोजी घेण्यांत आली. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी दरम्यान अर्जदारांना पुरविण्यांत आलेली माहिती बरोबर असल्याचे आदेश पारीत करण्यांत आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असे लेखी निवेदन दिले की, "अर्जदार यांना त्यांच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीवरुन सध्या मुंबई पोलिस अधिनियम चे कलम ५६अन्वये दोन वर्षाच्या

कालावधीकरिता मुंबई व ठाणे जिल्हयातून हद्दपार करण्यांत आलेले आहे. अपिलार्थी यांचा सध्याचा राहण्याचा पत्ता माहिती नसल्याने त्यांना सदर पत्राची प्रत देता येत नाही. "

अर्जदारांना संबंधीत पोलिस स्टेशनमध्ये काम करीत असलेल्या अधिका-याबाबत माहिती विचारली आहे. अधिनियमाच्या तरतूदीनुसार अशी माहिती पोलिस स्टेशनमध्ये काम करीत असलेल्या अधिका-याची व कर्मचा-याची माहिती ही स्वत:हून उपलब्ध करुन द्यायची असते त्यामुळे सदर पोलिस स्टेशनमधील कर्मचारी/अधिका-याची नावे ही अर्जदारास पुरविण्यांत यावी व ही माहिती अर्जदाराच्या शेवटच्या ज्ञात असलेल्या पत्त्यावर पाठविण्यांत यावी. सबब पुढील आदेश देण्यांत येत आहे.

-आदेश-

अपील अंशत: मान्य करण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २० एप्रिल २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/ ३८४ /०२

श्री.यादव बाबुलाल -अपिलार्थी
बुवा रा.सैताळे जि.धुळे

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपअभियंता --उत्तरवादी
सा.बा.उपविभाग कार्यालय, शहादा
जि.नंदूरबार

जन माहिती आधिकारी कार्यकारी अभियंता
सा.बा.उपविभाग कार्यालय, शहादा
जि.नंदूरबार

-विवेचन-

श्री.यादव बाबुलाल बुवा यांनी आयोगाकडे दि.४.९.२००९ रोजी व्दितीय अपिल सादर केले त्या अपिलाची सुनावणी दि.३.२.२००९ रोजी घेण्यांत आली. अपिलार्थी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

श्री.यादव बाबुलाल बुवा यांनी दि.५.४.२००७ च्या अर्जान्वये उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उपविभाग क्र.२, शहादा जि.नंदूरबार यांच्या अंतर्गत राबविण्यांत येणा-या योजनांची माहिती मागितली होती. यात अंदाज पत्रक मक्तेदाराचे नांव देखरेख अधिकारी, कामाची नांवे, एम.बी.रेकॉर्ड, वर्क ऑर्डर निविदा प्रकाशन इत्यादिचा समावेश होता. तथापि ही माहिती विहित मुदतीत न दिल्यामुळे त्यांनी दि.२९.५.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपीलावरील सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलार्थीने मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने ती टप्प्याटप्प्याने पुरविण्यांत येईल. यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी असे आदेश दिले की, जन माहिती अधिकारी यांनी कामाचे नियोजन करुन अपिलार्थीना माहिती उपलब्ध करुन द्यावी.

तथापि माहिती उपलब्ध न झाल्याने अपिलार्थीनी दि.४.९.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलाचे सुनाणीचे वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी असे निवेदन दिले की, अपिलार्थीना दि.८.१०.२००७ रोजी त्यांनी मागितलेली माहिती पुरविण्यांत आली आहे. त्या संदर्भात पोस्टाची रिसिट दाखविण्यांत आली. अर्जदारास ही माहिती न मिळाल्याने पुन्हा ही माहिती पाठविण्याचे जन माहिती अधिकारी यांनी मान्य केले.

-आदेश-

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
दिनांक २० एप्रिल २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/ २९६६/०२

श्री.राम अरविंद देशमुख — अपिलार्थी
सी-३१, टाटा सिम्पोनी, चांदीवली फर्म रोड,
पवई जवळ, अंधेरी (पूर्व),मुंबई.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहसचिव पोल-२
गृह विभाग मंत्रालय,मुंबई ३२ — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी जन माहिती अधिकारी पोल-२
गृह विभाग मंत्रालय,मुंबई ३२

-विवेचन-

अपिलार्थी श्री. राम अरविंद देशमुख यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३)नुसार दि.१७.१०.२००७ रोजी राज्य माहिती आयोग मुंबईकडे व्दितीय अपील केले आहे. सदर अपिलात जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी श्री.शिवाजीराव बोडखे, पोलिस उप आयुक्त, परिमंडळ-१२ श्री.शरद बोरसे, पोलिस निरिक्षक व श्री.नितीन यादव, पोलिस निरीक्षक यांच्या विरुध्द गुन्हेगारी गैरवर्तणूक, भ्रष्टाचार, उद्यापन (एक्सटॉरशन)अधिकाराचा गैरवापर इ.बाबत कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने विचारलेली माहिती उपलब्ध झाली नाही. तसेच जन माहिती अधिकारी यांनी विहित कालावधीत माहिती उपलब्ध न केल्याने त्यांच्या विरुध्द काय कार्यवाही केली याची माहिती मागविली आहे. सदर अपिलाच्या अनुषंगाने दि.२०.९.२००८ रोजी आयोगाच्या कार्यालयात सुनावणी ठेवण्यांत आली होती. त्यावेळेला अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

अपिलार्थीना दि.३०.८.२००७ च्या अर्जान्वये वर उल्लेख केलेल्या अधिका-यांच्या विरुध्द माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६७ चे उल्लंघन केल्यामुळे व मालमत्तेच्या अनुषंगाने त्यांच्या विरुध्द कार्यवाही करण्याबाबत जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती विचारण्यांत आली होती. सदर माहिती मिळविण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.२९.९.२००७ च्या पोलीस महासंचालक व पोलिस महानिरिक्षक, म.रा.मुंबई यांच्या कार्यालयास कळविले होते. तथापि अपिलार्थीना विहित कालावधीत माहिती न मिळाल्याने त्यांनी दि.३.१०.२००७ रोजी प्रथम अपिल केले. त्या अनुषंगानेही विहित कालावधीत माहिती न मिळाल्याने दि.१७.१०.२००७ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील केले.

आयोगाकडील व्दितीय अपिलाच्या अनुषंगाने सुनावणीच्या वेळेला अपिलार्थी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते. त्यावेळी त्यांची बाजू समजून घेण्यांत आली. अपिलाच्या सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे निवेदन सादर केले तसेच संबंधित कागदपत्राच्या प्रती सादर केल्या त्याची तपासणी करण्यांत आली. तसेच आयोगाकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांचीही तपासणी करण्यांत आली. त्यावरुन असे निदर्शनास आले की, प्रथम

अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या अपिलाच्या अनुषंगाने दि.२४.११.२००७ रोजी आदेश निर्गमित केले असून त्यामध्ये असे नमूद केले आहे की, मूळ अर्जात नमूद केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी संबंधीत कार्यालयाकडून प्राप्त करुन घेऊन अपिलार्थी यांना दि.५.११.२००७ व दि.२३.११.२००७ च्या पत्रान्वये दिलेली आहे.

अपिलार्थीना विहित कालावधीत माहिती मिळालेली नाही. तथापि सदर माहिती जन माहिती अधिका-यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याने ती संबंधीत कार्यालयाकडून मिळविण्यासाठी त्या कार्यालयास माहितीसाठीचा अर्ज मिळताच माहिती मिळविण्यासाठी त्वरीत प्रयत्न करावयास हवे होते परंतू तसे झाले नाही. त्यामुळे अपिलार्थीना माहिती उपलब्ध करण्यास विलंब झालेला आहे असे असले तरी संबंधीत कार्यालयाकडून माहिती मिळून दि.५.११.२००७ व दि.२३.११.२००७ च्या पत्रान्वये अपिलार्थीना माहिती दिली असल्याचे या प्रकरणात सौम्य दृष्टीकोन घेऊन यापुढे सदर माहितीचा अधिकार कायदयाच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने संबंधीत अधिका-यांनी सतर्क राहण्याबाबत समज देण्यांत यावी.

अपिलार्थीनी मागणी केलेली माहिती त्यांना उपलब्ध करुन देण्यांत आली असल्याने सदर अपिलाच्या अनुषंगाने खालील प्रमाणे आदेश पारित करण्यांत येत आहेत.

**-आदेश-**

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

माहिती विलंबाने दिल्याबद्दल संबंधित अधिका-यांनी यापुढे माहिती विहित कालावधीत पुरविण्यांबाबत सतर्क राहण्याबाबत समज देण्यांत यावी.

(डॉ.सुरेश वि.जोशी)

दिनांक २१ एप्रिल २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/ ४२०९ /०२

श्री.शेख इकबाल अहमद — अपिलार्थी
बी.आय.टी.नं.१ रुम नं.११५
आय.आर. रोड,मुंबई ४०० ००३

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहायक मनपा आयुक्त — --उत्तरवादी
सहाय्यक आयुक्त बृहन्मुंबई मनपा कार्यालय,
ई विभाग कार्यालय, १० शेख हफिजुद्दीन मार्ग,
भायखळा (प)मुंबई ४०० ०८

जन माहिती आधिकारी सहायक मनपा आयुक्त
सहाय्यक आयुक्त बृहन्मुंबई मनपा कार्यालय,
सहाय्यक आयुक्त बृहन्मुंबई मनपा कार्यालय,
ई विभाग कार्यालय, १० शेख हफिजुद्दीन मार्ग,
भायखळा (प)मुंबई ४०० ०८

-विवेचन-

श्री.शेख इकबाल अहमद यांनी आयोगाकडे दि.६.२..२००९ रोजी व्दितीय अपिल सादर केले त्या अपिलाची सुनावणी दि.२१.४.२००९ रोजी घेण्यांत आली. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

श्री. शेख इकबाल यांनी त्यांच्या दि.३.१२.२००८ रोजीच्या पत्रान्वये सोफीया झुबेर म्युनिसिपल स्कूलमध्ये ओल्ड स्टुडन्ट असोसिएशन यांना कोणत्या ॲक्टीव्हिटीज करण्याची परवानगी महापालिकेने दिलेली आहे हया संदर्भातील एकूण १४ मुद्दयाबाबची माहिती पाहिजे होती. सदर माहिती त्यांना देण्यांत आलेली आहे परंतू त्यांने अपिलार्थीचे समाधान झालेले नाही. त्यामुळे अर्जदाराशी व जन माहिती अधिकारी यांचेशी प्रत्यक्ष चर्चा करुन असे ठरविण्यांत आले की, दिनांक ५ मे २००९ रोजी सकाळी ११.०० वाजता जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारानी त्यांना हव्या असलेल्या विषयासंबंधीच्या नस्तीचे अवलोकन करण्यास देऊन त्यांना हव्या असलेल्या कागदपत्राच्या सत्यप्रती देण्यांत याव्यात. या कामी जन माहिती अधिकारी किंवा त्यांचे कार्यालयातील नामनिर्देशित केलेल्या अधिका-यांनी अर्जदारास नस्त्या तपासणीसाठी मदत करावी. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहे.

-आदेश-

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २१ एप्रिल २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/ ४२१२/०२

श्री. प्रकाश गोविंद नवाथे — अपिलार्थी
२०४ राजबाग, भालचंद्र मार्ग,
माटूंगा, मुंबई ४०००१९

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपप्रमुख अभियंता — --उत्तरवादी
(इमारत प्रस्तव) शहर ,बृहन्मुंबई मनपा कार्यालय,
ई विभाग कार्यालय, १० शेख हफिजुद्दीन मार्ग,
भायखळा (प)मुंबई ४०० ०८

जन माहिती आधिकारी कार्यकारी अभियंता,
(इमारत प्रस्तव) शहर-२ बृहन्मुंबई मनपा कार्यालय,
सहाय्यक आयुक्त बृहन्मुंबई मनपा कार्यालय,
ई विभाग कार्यालय, १० शेख हफिजुद्दीन मार्ग,
भायखळा (प)मुंबई ४०० ०८

-विवेचन-

अपिलाचा दिनांक : ६.३.२००९
सुनावणीचा दिनांक : २१.४.२००९
अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अर्जदारास राजबागसाठी तिसरा दरवाजा १५ फूट लांबीचा बी.सी.सी. नंतर उघडण्यास ज्या नियमाने परवानगी दिली आहे तो नियम स्पष्ट करणारी माहिती पाहिजे होती. याबाबत प्रथम अपिलीय अधिकारी यांचे दि.३.१.२००९ रोजीच्या प्रथम अपिलाच्या आदेशात सदर इमारत पूर्णत्वास आल्याचा दाखल दि.१६.९.२००४ रोजी स्विकारण्यांत आला त्यात उल्लेखित दरवाजा दाखविण्यांत आलेला आहे. अस्तित्वात असलेले सर्व दरवाजे इमारत प्रस्तावात दाखविले आहेत तसेच त्याबाबतची माहिती दिलेली आहे. अर्जदाराने या सर्व नस्त्याचे अवलोकनही केलेले असून त्यांना ज्या कागदपत्राची प्रत पाहिजे होती त्याची प्रतही त्यांनी घेतलेली आहे. श्री. नवाथे यांची या एकाच विषयावरील आयोगाने आतापर्यत १० अपिले यापूर्वी ऐकलेली आहेत. सबब पुढील प्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

-आदेश-

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २१ एप्रिल २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/ ४२१०/०२

श्री. चेतन कोठारी अपिलार्थी
५२, ओशियानिक अपार्टमेंट
डॉ.राजबाग पटेल लेन, बी. देसाई रोड,
मुंबई ३४०० ०२६

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा पोलिस उपआयुक्त --उत्तरवादी
(समन्वय)पोलिस आयुक्त यांचे कार्यालय,
क्रॉफर्ड मार्केट मुंबई-१

जन माहिती आधिकारी सहाय्यक पोलिस आयुक्त (समन्वय)
(समन्वय)पोलिस आयुक्त यांचे कार्यालय,
क्रॉफर्ड मार्केट मुंबई-१

-विवेचन-

अपिलाचा दिनांक : ३.३.२००९
सुनावणीचा दिनांक : २१.४.२००९
अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अर्जदाराला मुंबई शहरातील बंकर व त्या ठिकाणी तैनात केलेली सुरक्षा व्यवस्था व सुविधा याबाबतची माहिती पाहिजे होती. हा अर्ज पोलिस मुख्यालयाने विभागीय कार्यालयाना पाठविला व त्यातील काही कार्यालयाने माहिती दिलेली आहे व काही माहिती अधिनियमाच्या कलम ८ नुसार सुरक्षिततेचे कारण देऊन नाकारलेली आहे. सुनावणीच्या वेळेला अर्जदाराने सांगितले की, आता फक्त शहरात किती बंकर अस्तित्वात आहेत याचीच माहिती पाहिजे आहे. याबाबतची माहिती काही विभागीय कार्यालयानी दिलेली आहे. ज्या माहितीने सुरक्षिततेस धोका पोहचू शकत असेल तर अशी कोणतीही माहिती देऊ नये असे आयोगाला वाटते. त्यामुळे जे बंकर्स हे जनतेच्या प्रत्यक्ष सुरक्षिततेसाठी असतील व त्याचे लोकेशन जनतेला माहिती असणे आवश्यक असेल एवढयाच बंकरची माहिती देण्यांत यावी. शहरातील जे बंकर जनतेच्या वापरासाठीच नसतील तर त्याची माहिती देण्याची गरज नाही. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

-आदेश-

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
दिनांक २१ एप्रिल २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**अपील क्रमांक २००९/ ६०/०२**

**श्री. हेन्री थॉमस गॉडवीन -- तक्रारदार**
**प्लॅट १६, ३ रा मजला,**
**युनियन हाऊस-१ एल.जे.रोड,**
**माहिम मुंबई ४०००१६**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा पोलिस उपआयुक्त -- उत्तरवादी**
**(प्रतिबंध)पोलिस आयुक्त यांचे कार्यालय,**
**मुंबई-१**

**जन माहिती आधिकारी सहाय्यक पोलिस आयुक्त (समन्वय)**
**(समन्वय)पोलिस आयुक्त यांचे कार्यालय,**
**मुंबई-१**

**-विवेचन-**

**तक्रारीचा दिनांक : ३ .२.२००८**
**सुनावणीचा दिनांक : २.४.२००९**
**अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**तक्रारदार श्री. हेन्री थॉमस गॉडवीन यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.१०.२००८ रोजी तक्रार दाखल केली. तक्रारदाराने पोलिस आयुक्त बृहन्मुंबई यांना प्रत्यक्ष भेटून श्री. संदीप विश्णोई, पोलिस उपआयुक्त यांच्या विरुध्द तक्रार दाखल केली होती. सदर तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीची माहिती जन माहिती अधिका-याकडे माहितीचा अधिकारात अर्ज करुन मागणी केली होती. तक्रारदाराने केलेला तक्रार अर्ज कार्यालयाच्या अभिलेखावर उपलब्ध नसल्याचे जन माहिती अधिका-यांनी तक्रारदारास कळविले होते. यामुळे तक्रारदाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. तक्रारदारास जन माहिती अधिका-याने दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन प्रथम अपील निकालात काढले. यामुळे व्यथित होऊन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले होते. पोलिस आयुक्तांकडे केलेल्या तक्रार अर्जाची छायाप्रत प्रत तक्रारदाराने जन माहिती अधिका-यांनी सखोल चौकशी करुन तक्रारदारास माहिती द्यावी असे राज्य माहिती आयोगाने व्दितीय अपिलावर सुनावणी आयोजित करुन दि.१८.८.२००८ रोजी आदेश पारित केले आहेत. सदर आदेशानुसार जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नसल्याचे तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२.४.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता गैरतक्रारदार तसेच तक्रारदार हजर होते.**

**सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकून घेण्यांत आले. तसेच तक्रारीतील कागदपत्राची तपासणी करण्यांत आली.**

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, तक्रारदाराने श्री. संदिप विष्णोई, उपपोलिस आयुक्त, माहिती पोलिस स्टेशन हे गुन्हेगाराना संरक्षण देतात, पाठीशी घालतात, भ्रष्ट अधिकारी आहेत महणून त्यांच्याविरुध्द कारवाई करण्याबाबत अपीलकाराने पोलिस आयुक्त, बृहन्मंबई यांचेकडे तक्रार अर्ज दाखल केला होता. सदर तक्रारीस अनुसरुन सहाय्यक पोलिस आयुक्त, माहिम विभाग,मुंबई यांनी नव्याने सखोल चौकशी केली. संबंधितांचे जाब जबाब नोंदविले. सदर चौकशी अहवालाची प्रत संबंधित जाब जबाबाच्या प्रती दि.५.११.२००८ च्या पत्रासोबत अपीलकारास श्री. पुंडलिक बोदडे, सहाय्यक पोलिस आयुक्त (समन्वय)तथा जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिल्या. विरोधक श्री.नविन देडीया श्री.किरण छेडा, श्री.हिरेने छेडा व डिम्पल छेडा हे रंग खेळण्याकरिता युनियन हाऊ नं.२ च्या टेरेसवर गेले होते. टेरेसवर जाण्यावरुन तक्रारदार व विरोधक यांचेमध्ये धक्काबुक्की होऊन फिर्यादीचे उजव्या हातास व उजव्या पायास खरचटले यावरुन व अन्य ६ कारणावरुन पोलिस ठाण्यांत तक्रारदाराने तक्रार नोंदविली होती. सदर प्रकरणी सहाय्यक पोलिस आयुक्त यांनी नव्याने चौकशी करुन संबंधिताचे जाबजबाब नोंदवून त्यांच्या प्रती व चौकशी अहवालाच्या प्रती अपीलकारास दि.५.११.२००८ च्या पत्रासोबत दिल्या असल्याचे व्दितीय अपीलाच्या सुनावणीच्यावेळी लेखी अहवाल सादर करुन जन माहिती अधिका-याने प्रतिपादन केले. यावरुन तक्रारदारास गैरतक्रारदाराने मागणीप्रमाणे तक्रारीवर केलेल्या कारवाईची माहिती दिली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**-आदेश-**

तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २१ एप्रिल २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/ ४१४१/०२

श्री.सूर्यकांत गंगाराम चव्हाण — अपिलार्थी
३९/२/३ नवजीवन को.हौ.सोसायटी
इंदिरा नगर, पोलिस चौकीसमोर
सर्विस रोड, सांताक्रुज (पूर्व),मुंबई-५५

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सचिव --उत्तरवादी
झोपडपटटी पुनवर्सन प्राधिकरण,
५ वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे (पूर्व),मुंबई ५१

जन माहिती आधिकारी सहाय्यक निबंधक (सहकारी संस्था)
झोपडपटटी पुनवर्सन प्राधिकरण,
५ वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे (पूर्व),मुंबई ५१

-विवेचन-

अपिलाचा दिनांक : ७.२.२००९
सुनावणीचा दिनांक : १.४.२००९ व २२.४.२००९
दोन्ही वेळी सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी उपस्थित.
अर्जदारास पुढील माहिती पाहिजे होती :-

"झोपुप्रा कार्यालयाच्या वतीने रविवार दि.१०.८.२००८ रोजी उत्तर भारतीय संघ हॉल, एफ-ब्लॉक सिमेंट्री शेजारी, वांद्रे (पूर्व),मुंबई ४०००५१ या ठिकाणी मेसर्स शिवालिक व्हेन्चर्स यांच्या वतीने आयोजित करण्यांत आलेल्या प्रगती व इतर आठ गृहनिर्माण संस्थेतील पात्र रहिवाश्यांना सदनिकेचे वाटप संदर्भात जी सोडत काढण्यांत आली होती त्यावेळी झोप्रुप्रा कार्यालयाच्या वतीने त्या संपूर्ण कार्यक्रमाचे जे चित्रीकरण करण्यांत आले आहे. त्या चित्रीकरणाची चित्रफितीसह (सी.डी.)यावेळी ज्या पात्र रहिवाशांना सदनिका वितरीत करण्याचे ठरविण्यांत आले आहे त्या पात्र रहिवाशांची संपूर्ण यादीची साक्षांकित नक्कल प्रती व संबंधित सोडतीच्या ठिकाणी झोपुप्रा प्राधिकरणाच्या वतीने कोण कोणते अधिकारी जातीने उपस्थित होते त्यांची नांवे मिळणेबाबतचे आदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास देवून संबंधित शासकिय माहिती अधिकारी अपिलीय अधिका-यांना आदेश देऊन सुध्दा वेळेवर माहिती पुरविली नाही म्हणून त्यांच्यावर केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २०(१)अन्वये दंडनिय स्वरुपाची शास्ती करणेबाबत"

सदरील सदनिकेच्या सोडतीकरिता दि.१०.८.२००८ रोजी परवानगी देण्यांत आलेली होती. सदर वाटपाकरिता सहकार कक्षाचे प्रतिनिधी श्री.चंद्रशेख डोंगरवार हे उपस्थित होते. संस्थेतील पुनर्वसन योजनेतील संस्थेच्या वाटप यादीची झेरॉक्स प्रत व्हिडीओ चित्रिकरणाची सी.डी. संस्था व विकासकाकडे उपलब्ध आहे व ती त्यांच्या कडून अर्जदाराने प्राप्त करुन घ्यावी असे उत्तर मुदतीत

देण्यांत आलेले आहे.  यावर केलेल्या प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशात अर्जदार यांनी मागणी केलेली माहिती विकासक व संस्थेकडून उपलब्ध करुन द्यावी अथवा संस्थेविरुध्द सहकार कायदयातंर्गत कारवाई करण्यांत येईल अशा सूचना देण्यांत आल्या होत्या, असे सुनावणीच्या वेळी सांगण्यांत आले. सदनिकेची वाटप यादी व चित्रिकरण फिती त्यांच्या कार्यालयात आता प्राप्त झालेली आहे ती त्या कार्यालयातून घेऊन जाण्याबाबत अर्जदारास दि.१८.४.२००९ रोजी कळविण्यांत आलेले आहे व अर्जदारास आल्याबरोबर त्यांना ती माहिती देण्यांत येईल.सबब पुढील आदेश देण्यांत येत आहेत.

**-आदेश-**

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २२ एप्रिल २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/ ४२२२/०२

श्री.अर्जूनलाल एम.छाब्रिया --अपिलार्थी
बेले व्हिस्टा, प्लॅट नं.१५,
३ रा मजला, ले ॲन्ड एल.आय.सी. ऑफीससमोर
एस.व्ही.रोड, बांद्रा (प) मुंबई ४०० ०५०

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा पोलिस उपआयुक्त --उत्तरवादी
(परिमंडळ-९)हिल रोड,
वांद्रे (प),मुंबई ४०००५०

जन माहिती आधिकारी सहा.पोलिस आयुक्त.
पश्चिम नियंत्रण कक्ष, कार्टर रोड,
वांद्रे (प) मुंबई ४०००५०

-विवेचन-

अपिलाचा दिनांक : १८.३.२००९
सुनावणीचा दिनांक : २२.४.२००९
सुनावणीस अपिलार्थी यांचे प्रतिनिधी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.१३.१०.२००८ रोजी केलेल्या मुळ कलम-६ मधील अर्जान्वये श्रीमती नजिरा बेगम यांचा प्लॅट जबरदस्तीने बळकावून घेण्याबाबत जी तक्रार केली होती त्याबाबत माहिती विचारली होती. याबाबत अर्जदारास असे उत्तर देण्यांत आले की, सदर तक्रार दिवाणी स्वरुपाची असल्याने अर्जदाराने दिवाणी कोर्टात याबाबत दाद मागावी. याबाबत सविस्तर जबाब नोंदविण्यांत आलेला असून त्याची प्रत अपिलार्थीस देण्यांत आलेली आहे. यावर केलेल्या प्रथम अपिलात अपिलीय अधिकारी यांनी वरिष्ठ पोलिस निरिक्षक, ओशिवरा पोलिस ठाणे यांनी सदर अर्जानुसार चौकशी केलेल्या अहवालाची प्रत अर्जदारास देण्यांत यावी असे निर्देश दिले होते. त्यास अनुसरुन दि.१२.३.२००९ रोजीच्या पत्रान्व्ये अर्जदारास सदरील चौकशी अहवालाची प्रत पाठविण्यांत आलेली आहे. याने समाधान न झाल्यामुळे अर्जदाराने व्दितीय अपिल सादर केलेले आहे.

माहिती अधिकार अधिनियमामध्ये जसे कागदपत्र उपलब्ध असतील त्याप्रमाणे माहिती द्यावयाची असते. त्यानुसार सदर पोलिस स्टेशनने सदरील तक्रार दिवाणी स्वरुपाची असल्याने अपिलार्थीने दिवाणी कोर्टात दाद मागावी असे कळविलेले आहे. सदरील दिलेली माहिती बरोबर असल्याने पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

-आदेश-

अपिल अमान्य करण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
दिनांक २२ एप्रिल २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/ ४२३३/०२

श्री.नंदकुमार बी.शिंदे --अपिलार्थी
नागपाडा नेबरहुड हाऊस,
२ रा मजला, सोफिया झुबेर रोड,
भायखळा,मुंबई ४०० ००८

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपप्रमुख अभियंता --उत्तरवादी
(इमारत प्रस्तव) शहर ,बृहन्मुंबई मनपा कार्यालय,
ई विभाग कार्यालय, १० शेख हफिजुद्दीन मार्ग,
भायखळा (प)मुंबई ४०० ०८

जन माहिती आधिकारी कार्यकारी अभियंता,
(इमारत प्रस्तव) शहर-२ बृहन्मुंबई मनपा कार्यालय,
सहाय्यक आयुक्त बृहन्मुंबई मनपा कार्यालय,
ई विभाग कार्यालय, १० शेख हफिजुद्दीन मार्ग,
भायखळा (प)मुंबई ४०० ०८

-विवेचन-

अपिलाचा दिनांक : ६.०३.२००९
सुनावणीचा दिनांक : २३.४.२००९
सुनावणीस अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अर्जदारास नव्याने बांधलेल्या हयूम हायस्कूल शाळेसाठी वापरल्या गेलेल्या एफ.एस.आय.चा तपशिल व नव्याने बांधलेल्या फॉरच्यून टॉवर या इमारतीसाठी वापरल्या गेलेल्या एफ.एस.आय,चा तपशिल याबाबतची माहिती पाहिजे होती.

अर्जदारास सदर नस्त्याची तपासणी करुन त्यांना पाहिजे असलेली कागदपत्रे देण्यांत येतील असे कळविण्यांत आले आहे. अर्जदाराने "माहिती सांख्यिकी पध्दतीने द्यावी "अशी मागणी केलेली आहे. सुनावणीच्या वेळेला उपलब्ध असलेल्या नकाशामध्ये एफ.एस.आय.संबंधी सांखिकी आहे असे दिसून आल्याने याच्या प्रती अर्जदारास शुल्क भरुन देण्यांत याव्यात असे निर्देश जन माहिती अधिकारी यांना देण्यात आले. तसेच अर्जदारास नस्तीची पाहणी करावयाची असेल तर ती पाहणी करुन त्यांना हवी असणारी अतिरिक्त माहिती उपलब्ध करुन घेण्याची मुभा आहे. सबब पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

-आदेश-

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
दिनांक २३ एप्रिल २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/ ४२३५/०२

श्री.उमेश भगवान देवकर — अपिलार्थी
२४.२.११,दाभोळकर वाडी,
महात्मा गांधी स्मृती वसाहत,
जेरभाई वाडीया रोड, परळ, मुंबई ४०० ०१२

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा वित्त नियंत्रक --उत्तरवादी
झोपडपटटी पुनवर्सन प्राधिकरण,
५ वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे (पूर्व),मुंबई ५१

जन माहिती आधिकारी तथा लेखा अधिकारी
झोपडपटटी पुनवर्सन प्राधिकरण,
५ वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे (पूर्व),मुंबई ५१

-विवेचन-

अपिलाचा दिनांक : १३.०३.२००९
सुनावणीचा दिनांक : २३.४.२००९
सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अर्जदारास दाभोळकरवाडी, महात्मा गांधी स्मृती वसाहत या ठिकाणी दाखल झालेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या प्रस्तावासोबत जोडलेल्या विकासकाची परिशिष्ट-३ ची प्रत व महत्वाचे इतर कागदपत्रे/दस्तऐवज बाबची माहिती पाहिजे होती ती प्रत नाकारण्यांत आल्यामुळे आयोगाकडे व्दितीय अपिल सादर केलेले आहे.

आयोगाकडे असलेला मुख्य मुद्दा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे मार्गदर्शक तत्वानुसार जे परिशिष्ट-३ हे विहित करण्यांत आलेले आहे त्याची प्रत उपलब्ध होऊ शकते किंवा नाही हे ठरविणे हा आहे. परिशिष्ट-३ चे अवलोकन केले असता यामध्ये जो विकासक असतो त्यास योजनेसाठी किती खर्च लागणार आहे, तसेच सुरुवातीची गुंतवणूक जी २०%लागणार असते ती गुंतवणूक कशा पध्दतीने उपलब्ध राहिल याचे पुरावे द्यावे लागतात. यात कोणत्या बॅकेत किती शिल्लक आहे याचीहि माहिती दिली जाते असे अपिलीय अधिकारी यांनी सांगितले. तसेच उर्वरित ८०% रक्कम ही कशी उभी केली जाईल याची सुध्दा माहिती द्यावयाची असते. या व्यतिरिक्त इन्कमटॅक्स क्लिअरन्स ही माहिती सुध्दा या परिशिष्ट-३ मध्ये अंतर्भूत केलेली आहे.

या संदर्भात परिशिष्ट-३ च्या संदर्भात झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दि.१३.११.१९९७ रोजी जे परिपत्रक काढलेले आहे त्यात परिशिष्ट-३ चे परिपत्रक विशेष करुन विकासकाची आर्थिक क्षमता आजमावण्यासाठी सुविहित करण्यांत आलेली आहे व यात दिलेली माहिती

ही गोपनीय स्वरुपाची राहिल हेहि त्याच वेळेला स्पष्ट करण्यांत आलेले आहे. माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम ८ (१) (घ) हे पुढीलप्रमाणे आहे.

"वाणिज्य क्षेत्रातील विश्वासाहर्ता व्यावसायिक गुपिते किंवा बौध्दिक संपदा यांचा समावेश असलेली जी माहिती प्रकट करणे व्यापक लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे, अशी सक्षम प्राधिका-याची खात्री पटली असेल त्या माहिती व्यतिरिक्त, जी प्रकट केल्याने त्रयस्थ पक्षाच्या स्पर्धात्मक स्थानाला हानी पोहोचेल अशी माहिती "

व यात असलेली माहिती प्रकट केल्यामुळे त्रयस्थ पक्षाच्या स्पर्धात्मक स्थानाला हानी पोहोचण्याची शक्यता दिसत असल्यामुळे अर्जदारास माहिती न देण्याचा अपिलीय अधिका-यानी घेतलेला निर्णय हा योग्य असाच आहे असे आयोगाचे मत आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यांत येत आहेत.

**-आदेश-**

अपिल अमान्य करण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)

दिनांक २३ एप्रिल २००९

राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/३८४७/०२

श्री.नविन एस.परब, अपिलार्थी
१ ला मजला, मुळगांवकर इमारत
७ टोपीवाला लेन लॅमिंग्टन रोड, मुंबई -२००७

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक --उत्तरवादी
सहकारी संस्था, जिल्हा उपनिबंधक स.संस्था,डी विभाग कार्यालय,
मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला,जीपीओसमोर,
फोर्ट, मुंबई ४०० ००१

जन माहिती आधिकारी तथा उपनिबंधक,
सहकारी संस्था, जिल्हा उपनिबंधक स.संस्था,डी विभाग कार्यालय,
मल्होत्राहाऊस, ६ वा मजला,जीपीओसमोर,
फोर्ट, मुंबई ४०० ००१

-विवेचन-

अपिलार्थी श्री. नविन एस.परब यांनी न्यू श्री. सागर सोसायटी/अपार्टमेंट वाळकेश्वर,मुंबई ४०००0६ च्या अनुषंगाने मागविलेली माहिती जसे संस्थेच्या नोंदणी बाबतचा तपशिल, संस्थेच्या सदनिका मालकाचे नांव इ. माहिती जन माहिती अधिका-यांनी देण्याचे नाकारले तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी योग्यती सुनावणी न घेता व गुणवत्तेवर न पाहता प्रथम अपिल फेटाळले असल्याचे नमूद करुन दि.१७.११.२००८ रोजी आयोगाकडे व्दितीय अपिल केले आहे. आयोगाकडील व्दितीय अपिलाची सुनावणी दि.२५.२.२००९ रोजी आयोगाच्या कार्यालयात आयोजित करण्यांत आली. त्यावेळेला अपिलार्थी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

अपिलार्थीनी दि.१४.७.२००८ च्या अर्जान्वये न्यू. श्री. सागर सोसायटी/अपार्टमेंटचा नोंदणी बाबतचा तपशिल इत्यादि अ.ब.क व ड अशा चार मुद्दयामध्ये नमूद केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागविली असता जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.१३.८.२००८ च्या पत्रान्वये मुद्दा क्र. "ब" व "क" बाबतची माहिती तया कार्यालयाचा अभिलेख कक्षाचा भाग नसल्याने संस्थेकडून सदर माहिती प्राप्त करुन घेण्याचे कळविले. तसेच मूद्दा क्र. "ड" बाबत संस्थेच्या सभेचे इतिवृत्त कार्यालयाकडे सादर करण्याची तरतूद नसल्याचे कळविले, असे असतानाही अपिलार्थीनी जन माहिती अधिका-यांना केलेला माहितीसाठीचा अर्जास ३० दिवस पूर्ण होण्यापूर्वीचा जन माहिती अधिका-याकडून माहिती मिळाली नाही असे नमूद करुन दि.८.८.२००८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिल केले. सदर अपिलाची सुनावणी दि.१४.१०.२००८ रोजी घेण्यांत आली. सुनावणीच्या वेळेला अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित असल्याचे नमूद करण्यांत आले आहे. अपिलार्थीनी त्यावेळी लेखी निवेदन सादर करुन त्या व्यतिरिक्त काहीही म्हणावयाचे नसल्याचे तसेच जन माहिती अधिका-यांच्या प्रतिनिधीनी अपिलार्थीना दि.१३.८.२००८

रोजी उत्तर दिल्याचे सांगितले असल्याचे प्रथम अपिलीय अधिका-यांच्या दि.२७.१०.२००८ च्या आदेशात नमूद केले आहे. तसेच जन माहिती अधिका-यांच्या स्तरावर उपलब्ध असलेली माहिती अर्जदारांना दिलयाचे तसेच मागणी केलेली इतर माहिती जन माहिती अधिका-यांच्या कार्यालयात जतन केली जात नाही असे नमूद करुन प्रथम अपिल फेटाळून त्याप्रमाणे दि.२७.१०.२००८ रोजी आदेश निर्गमित केले.

प्रथम अपिलीय अधिका-यांच्या आदेशाने व्यथित होऊन अपिलार्थीनी केलेल्या व्दितीय अपिलाच्या सुनावणीच्या वेळेला उपस्थित असलेले अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची बाजू ऐकून घेण्यांत आली तसेच त्यांनी केलेली निवेदने, खुलासा व आयोगाकडे उपलब्ध असलेली कागदपत्रे यांची तपासणी करण्यांत आली. सहकारी गृहनिर्माण संस्था हे स्वत:हून सार्वजनिक प्राधिकरण नाही. पण अर्जदाराने संस्थेकडून असलेली माहिती त्यांचेकडूनच घ्यावी असे नमूद केले आहे व संस्थेला जी जी माहिती देण्याचे निर्देशहि दिले आहेत, हे योग्य आहे. संस्थेने जर या निर्देशाचे पालन केले नाही तर अर्जदारास सहकारी कायदयातंर्गत निबंधकाकडे तक्रार करता येईल व त्याची दखल निबंधक घेतील. सहकारी संस्थेची जी माहिती सहकारी कायदयांतर्गत जन माहिती अधिकारी कार्यालयात आहे तेवढी देण्याची मात्र जबाबदारी त्यांची असते. त्यावरुन प्रथम अपिलीय अधिकरी यांनी पारीत केलेल्या दि.२७.१०.२००८ चे आदेश योग्य असल्याचे मत झाल्याने प्रथम अपिलीय अधिका-याच्या सदर आदेशास सहमती दर्शवून खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यांत येत आहेत.

**-आदेश-**

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)

दिनांक २३ एप्रिल २००९

राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/ ४२३८/०२

श्रीमती चित्रा अनंत साळुंके — अपिलार्थी
१ बी/१ गुरुअर्थ सोसायटी, रोड न.२,
सिंधी सोसायटी चेंबूर मुंबई ७१

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहाय्यक पोलिस आयुक्त
आ.गु.वि.पोलिस आयुक्त मुख्यालय,मुंबई — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी पोलिस आयुक्त
पोलिस आयुक्त, कार्यालय डी.एन.रोड मुंबई.१

-विवेचन-

अर्जदाराने अप्पर पोलिस आयुक्त (तात्कालीन) यांचेकडे सध्याचे औरंगाबादचे आयुक्त श्री.बिश्नोई के.ए. यांचे संपूर्ण नांव काय आहे? ही माहिती विचारलेली आहे ती माहिती अर्जदारास देण्यांत आलेली आहे.

सुनावणीच्या वेळेला पुन्हा पोलिस उपायुक्त आर्थिक गुन्हे विभाग गुन्हे शाखा, मुंबई यांनी सध्याचे औरंगाबादचे आयुक्त यांचे नांवासंबंधी पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण केलेले आहे :-

"अपिलार्थी प्रो. चित्रा साळुंखे यांनी मागणी केल्याप्रमाणे श्री. के.एल.बिश्नोई यांचे संपूर्ण नावाबाबत मा.पोलिस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे कार्यालय येथील प्रशासकिय कक्ष-३/वरिष्ठ आस्थापना येथून माहिती मागविली असता, अभिलेखावर त्यांचे संपूर्ण नांव "श्री. कृष्ण लाल बिश्नोई " असे असल्याबाबत माहिती प्राप्त झालेली आहे व तशी माहिती अपिलार्थी यांना यापूर्वी देण्यांत आलेली आहे."

रेकॉर्डमध्ये जसे नाव अस्तित्वात आहे त्याप्रमाणे माहिती दिलेली असल्यामुळे पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

-आदेश-

अपिल अमान्य करण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २३ एप्रिल २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/ ४२४०/०२

श्री.शौकत हकीम — अपिलार्थी
अ-१३, सत्यशिल सोसयटी,
सीकेपी कॉलनी माग्र,
इक्सार रोड,बोरीवली (प),मुंबई ९१

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा जन माहिती अधिकारी
विधी व न्याय विभाग, — उत्तरवादी
अ शाखा, मंत्रालय, ३ रा मजला, मुंबई.

-विवेचन-

अपिलाचा दिनांक : २५.२..२००९
सुनावणीचा दिनांक : २३.४.२००९
सुनावणीस अपिलार्थी, अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अर्जदाराने स्पेशल मॅजिस्ट्रेट यांच्याकडून ज्युडिशियल पॉवर संबंधीचे तसेच नॉन ज्युडिशियल स्टॅम्प पेपरवर कागदपत्र प्रमाणित करुन देण्याच्या अधिकाराबाबत माहिती पाहिजे होती. प्रथमतः जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती वेगवेगळया अधिका-यानी द्यावी म्हणून अर्जदाराचा अर्ज त्यांचेकडे पाठविला होता. मात्र प्रथम अपिलीय अपिलाचे आदेशात अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिका-यास ही माहिती गोळा करुन अर्जदारास द्यावयाची, असे निर्देश दिले व अर्जदाराला सुनावणीच्या वेळी विचारले असता त्यांना त्यांच्या मुद्दयाप्रमाणे माहिती मिळाली असे त्यांनी सांगितले. अर्जदाराच्या अपिलाचा रोख हा मुख्यत्वे करुन अपिलीय अधिकारी यांचेकडे सुनावणी होत असताना योग्यती पध्दतीची अंमलबजावणी अंमलात न आणल्याच्या बाबतीत आहे. अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या पुढील माहितीचा अधिकार अधिनियम याखाली सादर केलेले अपिल हे अर्धन्यायिक स्वरुपाचे असल्यामुळे योग्यती पध्दत अंमलात आणणे आवश्यक आहे. मात्र अंतिमतः दिलेले आदेश हे माहितीचा अधिकार अधिनियम यातील तरतूदीशी सुसंगत व कायद्याच्या तत्वानुसार (as per spirt of law)जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास उशिर लावला. तीन ठिकाणाहून माहिती यावयाची असल्याने माहिती देण्यास उशिर लागला. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपिलाचा निर्णय देण्यास उशिर लावला आहे याबाबतची पुनरावृत्ती टाळावी. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

-आदेश-

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
दिनांक २३ एप्रिल २००९ — राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/ ३८०/०२

श्री.एकबाल अहमद अ. रज्जाक — अपिलार्थी
कसाब वाडा. मशिदी समोर,
म.न.पा. दवाखान्या शेजारी,
धुळे

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) — उत्तरवादी
वेतन व भ.नि.नि.पथक
जेल रोड,धुळे ४३४००१

जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक
वेतन तथा भ.नि.नि. पथक,
जि.प.धुळे

-विवेचन-

अपिलाचा दिनांक : २९.९..२००७
सुनावणीचा दिनांक : ३. २.२००९
सुनावणीस अपिलार्थी, अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

श्री.एकबाल अहमद अ.रज्जाक यांनी दि.५.३.२००७ च्या अर्जान्वये एकूण २५ मुद्यांवर माहिती मागितली. यातील मुद्दा क्र.१ ते ८ ची माहिती मुख्याध्यापिका मौलाना आझाद, उर्दु हायस्कूल,धुळे, मुद्दा क्र.९ ते १२,१५,१६,२३ ते २५ ची माहिती मुख्याध्यापक, इस्लाहूल वनात ऊर्दू हायस्कूल व मुद्दा क्र.१३ व १५ ची माहिती मोहम्मदिया बॉईज ऊर्दू हायस्कूल,धुळे यांच्याकडून प्राप्त करावी, असे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.१२.३.२००७ अन्वये अपिलार्थीस कळविले. तथापि या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीनी दि.१०.५.२००७ रोजी प्रथम अपिल दाखल केले. यात त्यांनी अपिलाचे कारण असे नमूद केले की, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहिती उपलब्ध असताना व ती पुरविणे बंधनकारक असताना माहिती पुरविण्यास कसूर केली. यात पुढे अशी मागणी केली की, जन माहिती अधिकारी यांच्यावर यास्तव दंडात्मक कारवाई करण्यांत यावी. या अर्जावर सुनावणी झाली नाही. प्रथम अपिलीय अधिका-याने माहिती पुरविण्यासाठी संबंधित शाळांच्या मुख्याध्यापकांना दि.२९.६.२००६ रोजी पत्र देऊन अपिलार्थीना माहिती देण्यास सुचविले.

अपिलार्थीनी दि.२९.९.२००७ रोजी या संबंधात व्दितीय अपील दाखल केले. अपिलावरील सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे म्हणणे लेखी सादर केले. त्यांनी दिलेल्या निवेदनाचे अवलोकन करता ही बाब स्पष्ट होते की, अपिलार्थीनी मागितलेली माहिती जरी संबंधित शाळांच्या जन माहिती अधिकारी यांनी देणे अपेक्षित जरी असले तरी प्रथम अपीलावर सुनावणी होऊन तसे आदेश पारित करणे आवश्यक होते. परंतू तसे न करता प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीना पत्राने कळवून माहिती संबंधित शाळांकडून उपलब्ध करुन घेण्यास सुचविले. यावरुन स्पष्ट होते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील तरतूदीनुसार

अपीलाची सुनावणी घेतली नाही.  यापुढे त्यांनी याबाबत दक्षता घ्यावी. शाळांना माहिती पुरविण्यास सांगणे हे गैर नाही. शाळांकडून जी  माहिती प्राप्त झाली ती अर्जदारास व्दितीय अपीलाच्या सुनावणीनंतर लगेचच देण्यांत येत असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले.

-आदेश-

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
दिनांक २३ एप्रिल २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/ ३१२/०२

श्री.संतोष नामदेव परतणे, अपिलार्थी
सौ.रुपाली चेतन परतणे
रा.फैजपूर जि. जळगांव

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहायक निबंधक उत्तरवादी
सहाकारी संस्था यावल जि. जळगांव

जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक
सहाकारी संस्था जळगांव

-विवेचन-

श्री.संतोष नामदेव परतणे व सौ.रुपाली चेतन परतणे यांनी आयोगाकडे दि.६.११.२००७ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये जे व्दितीय अपिल सादर केले. त्या अपिलाची सुनावणी दि.२.२.२००९ रोजी जळगांव येथे घेण्यांत आली. त्यावेळेला अपिलार्थी श्री. संतोष नामदेव परतणे, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

अपिलार्थी यांनी दि.१६.६.२००७ व दि.२३.६.२००७ च्या अर्जान्वये (१)फैजपूर जनता सहकारी बॅंक लि. फैजपूर व (२)दि भुसावळ पिपल्स को.ऑप.बॅंक लि.भुसावळ या संस्थांनी केलेल्या अर्जानुसार कलम १०१ च्या अनुषंगाने झालेल्या सुनावणी संबंधी माहिति व सुनावणी कामी जमा असलेली कागदपत्रे यांच्या नकलांची मागणी केली होती. त्या अनुषंगाने फैजपूर जनता सहकारी बॅंके लि.फैजपूर या संस्थेबाबतची माहिती दि.२७.६.२००७ रोजी बॅंकेने अपिलार्थीना दिल्याचे दि.२४.७.२००७च्या जन माहिती अधिकारी यांच्या पत्रात नमूद केले आहे. तर दि भुसावळ पिपल्स को.ऑप. बॅंक लि.बाबतची माहिती आवश्यक फी भरुन घेऊन जाण्याचे दि.२४.८.२००७ च्या पत्रान्वये अपिलार्थीना कळविल्याचे दिसते असे नमूद करुन दि.२७.८.२००७ रोजी प्रथम अपिल केले. सदर अपिलाची सुनावणी दि.१७.९.२००७ रोजी घेण्यात आली. त्यावेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. तसेच सुनावणीच्या वेळी अपिलार्थीचे लेखी जबाब लक्षात घेण्यांत आले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिल अंशतः मंजूर करुन जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती/कागदपत्रे अपिलार्थी यांना पुरविण्याचे आदेश दि.२६.९.२००७ रोजी आदेश पारित केले. तद्नंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीनी नियमानुसार फी भरुन माहिती घेऊन जाण्याचे दि.४.१०.२००७ च्या पत्रान्वये कळविले. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे संपर्क साधूनही माहिती अपिलार्थीना मिळाली नसल्याचे कागदपत्रावरुन दिसते.

आयोगाकडील सुनावणीच्या वेळेला अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी त्यांची बाजू मांडली. त्यावरुन असे दिसते की, अपिलार्थीचे म्हणणे असे आहे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली नाही. हा वाद संपूष्टात आणण्याचे दृष्टीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीची तपासणी करण्यासाठी दि.९.२.२००९रोजी अर्जदारांना तपासणी करण्याचे सुनावणीच्या वेळेला निर्देश दिले होते. व त्यांनी निवड केलेल्या

कागदपत्रांच्या प्रती त्यांना विनामुल्य देण्यांत याव्यात.  त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही केली असावी.

**-आदेश-**

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २३ एप्रिल २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/ ३४९/०२

श्री.संतोष नामदेव परतणे, अपिलार्थी
सौ.रुपाली चेतन परतणे
रा.फैजपूर जि. जळगांव

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहायक निबंधक उत्तरवादी
सहाकारी संस्था यावल जि. जळगांव

जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक
सहाकारी संस्था जळगांव

-विवेचन-

अपीलकार श्री.संतोष नामदेव परतणे यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३)अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.६.११.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१७.४.२००७ रोजी अर्ज करुन श्री.एस.बी.अंधारे, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, भुसावळ यांचे कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात येणा-या सर्व नागरी सहकारी बॅंक, सहकारी संस्था, व पतसंस्था यांनी दाखल केलेल्या १०१ च्या वसूली प्रमाणपत्र मिळणेबाबतच्या अर्जासंबंधी दिलेल्या निवाडयाबाबतची विस्तृत माहिती व त्यासंबंधीची कागदपत्राच्या नकला करुन मिळणेबाबत मागणी केली होती.

त्रयस्थ इसम, कर्जदार,जमिनदार यांच्या सन्मानाला हानी पोहचेल अशा प्रकरणाची अपीलकाराने माहिती मागितली असल्याने अर्जात नमूद केलेली माहिती देता येत नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२९.९.२००७ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.४.६.२००७रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२४.७.२००७ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था भुसावळ यांनी कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती/कागदपत्रे अपीलकारास पुरवावीत असे दि.२४.८.२००७ रोजी आदेश पारित केले. यानंतरही जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत कॅंप, जळगांव येथे दि.३.२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकून घेण्यांत आले. तसेच अपिलातील कागदपत्राची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन सहायक निबंधक सहकारी संस्था, भुसावळ यांच्या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात येणा-या सर्व नागरी सहकारी बॅंका,सहकारी संस्था,पतसंस्था यांनी दाखल केलेल्या कलम १०१ च्या वसुली प्रमाणपत्र मिळणेबाबतच्या अर्जासंबंधी दिलेल्या निवाडयाबाबतची आगस्ट २००५ ते दि.३१ मार्च

२००७या कालावधीची विस्तृत माहिती मागितली होती. कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपीलकारास देणेबाबत प्रथम अपिलीय अधिका-यानी जन माहिती अधिका-यांना आदेश दिले होते. तरीही जन माहिती अधिका-याची सदर कृती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ चा भंग करणारी आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा उक्त अधिनियमातील कलम २० अनुसार जन माहिती अधिका-याविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

-आदेश-

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)

दिनांक २३ एप्रिल २००९

राज्य मुख्य माहिती आयुक्त